मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

»मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
»पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
»नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
»वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | » गुरुवार, १२ जून २०२५ | » वर्ष: १ | » अंक:१५ | » पाने-८ | » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## काँग्रेसचा आज राज्यभर मशाल मोर्चा

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

राज्य विधानसभा निवडणुकीतील वाढीव मतदानाचा मुद्दा काँग्रेसने पुन्हा हातात घेतला असून या मुद्द्यावर जनजगृती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीतील घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वतः गडचिरोलीमधील आंदोलनात सहभागी होणार आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला प्रचंड यश मिळाले होते. विधानसभा निवडणुकीत युती १०० जागाही जिंकू शकणार नाही, अशी परिस्थिती असताना भाजप युतीला प्रचंड बहुमत मिळाले. विधानसभा निवडणुकीचा हा निकाल अनाकलनीय आणि अविश्वसनीय आहे.त्यामुळे निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदानाच्या टक्केवारीवर संशय निर्माण झाला आहे. हा एक मोठा घोटाळा असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला आहे.

# जरांगे-पाटलांचा बच्चू कडूंना पाठिंबा

## बच्चू कडूंची मागणी मान्य नाही केली तर आम्ही रस्त्यावर उतरू

**अमरावती, दि. ११ प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी अमरावतीमध्ये अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे. आज मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बच्चू कडू यांची भेट घेत तब्बेतीची विचारपूस केली. तसेच कडू यांच्या आंदोलनालाही पाठिंबा दिला. बच्चू कडू यांनी तब्बेतीची काळजी घ्यावी असे जरांगे म्हणाले. जर न्याय मिळत नसेल तर रस्त्यावर उतरावं लागते. समाजाने आणि शेतकऱ्यांनी रास्ता जाम करून टाकायला पाहिजे असे जरांगे म्हणाले. शेतकऱ्यांनी एक बैठक घ्यावी आणि एक तारीख ठरवून पूर्ण राज्य बंद करावं, शेतकरी कर्जमाफी होत नाही तोपर्यंत बंद करावा असेही मनोज जरांगे म्हणाले. सगळ्यात वाईट परीस्थिती विदर्भ आणि मराठवाड्याची आहे. यांनी जर ठरवलं तर काहीही होईल. फडणवीस साहेब जर बच्चू कडू यांना काही झालं तर मी आहे हे लक्षात ठेवा असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.**

मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सांगतो बच्चू कडू यांच्या मागण्या पूर्ण करा. आपण शेतकऱ्यांचे मुलं आहोत, इथं जात पात आणू नका असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

बच्चू कडू जीवाची बाजी लावत आहेत. उपोषण करताना त्रास काय असतो ते मला माहिती आहे. चेहऱ्यावर जाऊ नका, त्रास खूप असतो. नाइलाजाने ते हसत बोलत राहतात. मी सल्ला देऊन जातोय. ते



आराम करतायेत असं समजू नका असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्याची संधी आहे. बच्चू कडू उपोषणाला उठाव करण्यासाठी बसले आहेत. शेतकऱ्यांनो सगळे रस्ते जाम करा. बच्चू भाऊसाठी फक्त एक दिवस. पूर्ण रस्ते जाम करा. हात जोडून विनंती आहे सगळे बच्चू कडू यांच्यामागे उभे रहा असे आवाहन जरांगे यांनी केले. एक बैठक घ्या एक दिवस ठरवा आणि पूर्ण राज्य बंद नाही केलं तर माझं नाव मनोज जरांगे नाही असेही ते म्हणाले. शेतकऱ्यांशीवाय दुसरं आहे कोण? सगळे शेतकरीच आहेत. आमदार, खासदार, मंत्री, डॉक्टर, शिक्षक सगळे शेतकरी आहेत असेही ते म्हणाले. मी विनंती करतो की, बच्चू भाऊची तब्बेत खराब होत आहे. एक दिवस ठरवा सगळे बंद करा, एक दिवस रस्त्यावर उतरा असे कडू म्हणाले.

अग्रग्रलेख

## खरीखरी

### रेल्वेचे २४ तास

**भारतीय रेल्वेने गेल्या काही काळापासून कात टाकलेली आहे. नवनवीन गाड्या सुरू झालेल्या आहेत. त्यामध्ये वंदेभारत ही वेगवान गाडी आता चांगलीच लोकप्रिय होत आहे. या प्रकारच्या गाड्यांच्या डब्यात चांगल्या सुधारणा झालेल्या आहेत. प्रवाशांनी तक्रार केल्यावर लगेच प्रतिसाद मिळतो. अनेक ठिकाणचे अंतर कमी वेळात पार होते. थोडक्यात आपल्या देशातील रेल्वेचे जाळे अत्याधुनिक रितीने चालवण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. गेल्या काही वर्षात रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या मोठ्या प्रमाणात कमी झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनता या गाड्यांचा उपयोग करून प्रवास करण्यामध्ये आघाडीवर होती. या पॅसेंजर गाडीची तिकिटे अत्यंत म्हणजे अत्यंत कमी किमतीत मिळत असत. या गाड्या सर्व स्थानकावर थांबत असत. त्यात रिझर्वेशनची काहीच भानगड नसे. रेल्वेने या प्रकारच्या अनेक लोकप्रिय गाड्या बंद करून टाकल्यामुळे लहान गावातील रेल्वेची स्थानके अगदी ओकी-बोकी झालेली आहेत. संपूर्ण भारतातील कितीतरी पॅसेंजर गाड्या बंद झाल्यामुळे कमी अंतरावर जाण्यासाठी जी सुविधा उपलब्ध होती. ती आता जवळजवळ बंद झालेली आहे. पण ज्या प्रमाणात अत्याधुनिक गाड्या वेगवेगळ्या मार्गावर सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याची परिणीती या गाड्या बंद होण्यातच होइल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. एकूणच रेल्वेच्या वेगापासून ते खाना-पानापर्यंतची माहिती हल्ली सहज उपलब्ध होत असते. आतापर्यंत रिझर्व केलेल्या म्हणजेच आरक्षित केलेल्या तिकिटांची माहिती चार तासांपूर्वी जाहीर करण्यात येत होती. तोपर्यंत ज्यांची तिकिटे वेटिंग लिस्टवर असायची. जे वेटिंग लिस्टवर असायचे. त्यांच्या मनाची धाकधूक प्रचंड वाढत असे. केवळ चार तासाच्या वेळात दुसरी काही पर्यायी व्यवस्था करणे शक्यच नव्हते. त्यामुळे पूर्ण पैसे भरून प्रवाशांना चोरासारखा प्रवास करावा लागत होता. आता नुकताच रेल्वे कडून एक निर्णय झाल्याची बातमी आलेली आहे. त्यामध्ये रिझर्वेशन नसल्यास जबर दंड करण्यात येइल असे ठरलेले आहे. या सर्व खटाटोपामध्ये रेल्वेने आता आरक्षण यादी प्रवासापूर्वी 24 तास जाहीर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करणे सुलभ होणार आहे. दुसऱ्या गाडीची तत्काळ तिकिटे घेणे किंवा इतर काही व्यवस्था करणे. शक्य होऊन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. दिवसेंदिवस आपली भारतीय रेल्वे प्रवाशांभिमुख होत आहे. रेल्वेच्या 24 तासांच्या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे. त्यामुळे प्रवाशांची धावाधाव थांबेल आणि रेल्वेचे आरक्षण नसलेल्या प्रवाशांची गर्दीही कमी होइल. हा त्यामधील फायदा आहे.**

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## 10 वर्षांत जुन्या बसेस जाणार, डेपोंचाही कायापालट - सरनाईक

**पुणे, दि. ११ प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या परिवहन खात्यातील (एसटी) सर्व बसेस इलेक्ट्रीक करणार असून पुढील १० वर्षांत जुन्या एसटी बसेस टप्प्याने बंद केल्या जातील आणि त्या जागी नवीन बसेस येतील, अशी घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी पुण्यात केली. तसेच राज्यातील सर्व एसटी बस आणि डेपो अद्ययावत करण्याचे काम दोन महिन्यात सुरू होणार असून सुरक्षा आणि स्वच्छता याचा विचार करून काम केले जाईल, असे आश्वासन सरनाईकांनी दिले.

प्रताप सरनाईक हे बुधवारी कार्यक्रमानिमित्त पुण्यात होते. माध्यमांशी संवाद साधताना सरनाईक यांनी एसटीच्या विकासाचा प्लानच मांडला. एसटी खात्यात 5 हजार बस घेणार असू तर त्यापैकी एक हजार बस या इलेक्ट्रिक घेण्याचे संकेत त्यांनी दिले. पुढील काही वर्षात एसटीच्या सर्व बसेस इलेक्ट्रिक असतील. २०२९ पर्यंत ताफ्यात २५ हजार बसेस दाखल होणार आहेत, असं त्यांनी सांगितले.

सरनाईक यांनी या स्मार्ट बसमध्ये सर्व आवश्यक सेवा-सुविधा आणि



सुरक्षितता यंत्रणा असतील असे स्पष्ट केले. स्वारगेट घटनेच्या पार्श्वभूमीवर, बाहेरील व्यक्ती बसमध्ये सहजपणे प्रवेश करू शकणार नाहीत, अशी यंत्रणा बसमध्ये असावी, यावर त्यांनी भर दिला. आग किंवा इतर घटना घडल्यास तातडीने प्रतिसाद देणारी यंत्रणा बसमध्ये असणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एसटी महामंडळाला सध्या ११ हजार कोटींचा संचित तोटा असून, यावर श्वेतपत्रिका काढणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. जुन्या चुका सुधारून नव्या पद्धतीने काम सुरू केले जाईल, मात्र या सुधारणा लगेच न होता, पुढील अडीच वर्षांत हळूहळू होतील असे त्यांनी स्पष्ट केले.

बसेस लिझवर न देता, काही ठिकाणी त्या तयार करून घेतल्या जातील आणि त्यांची मालकी एसटी महामंडळाकडेच राहील, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली असतानाच शिंदेचे निकटवर्तीय आणि त्यांच्याच बालेकिल्ल्यातून निवडून येणारे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या विधानाची राजकीय वर्तुळात चर्चा होतेय. परिवहन खात्याला अजित पवार सढळ हाताने निधी देत आहेत. महायुतीत कोणतीही नाराजी नाही, असं प्रताप सरनाईकांनी सांगितलंय. कदाचित मी जुना सहकारी असल्याने निधीची अडचण येत नाही. इतर खात्यांबद्दल मला माहिती नाही, असं त्यांनी स्पष्ट केले. महायुतीत कोणतीही नाराजी नसून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील महायुतीचा निर्णय हे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील, असा पुनरुच्चार त्यांनी केला.

पुण्यात भारतातील सर्वात मोठ्या कमर्शियल वाहन व रोड ट्रान्सपोर्ट इंडस्ट्रीवरील 'कमर्शियल व्हेईकल फोरम २०२५' परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेतही प्रताप सरनाईक यांनी प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली. सरनाईक यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र शासनाने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ई-वाहन पॉलिसीवर प्रकाश टाकला. या पॉलिसीचा मुख्य उद्देश ई-वाहनांच्या उत्पादनाला चालना देणे, तसेच वापरकर्त्यांना प्रोत्साहन देणे हा असल्याचे त्यांनी सांगितले. वाहन निर्मिती उद्योगांमध्ये महाराष्ट्राचे देशातील अग्रगण्य स्थान त्यांनी अधोरेखित केले.

## निवडणुका एकत्र महायुतीत लढणार - बावनकुळे

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. यासाठी प्रशासनासह सर्वच राजकीय पक्ष तयारी करत आहेत. या निवडणुका स्थानिक स्तरावर होत असल्याने याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे. आता या निवडणुका एकत्र लढणार की स्वतंत्र याबाबत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे महत्वाचे विधान केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील युतीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले की, 'राज्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्र महायुती म्हणून लढणार आहोत. याबाबतचे आदेश आम्ही पक्षातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत. आमचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते एकमेकांची याबाबत चर्चा करत आहेत. मात्र जर एखाद्या ठिकाणी एखाद्या जागेवरून वाद निर्माण झाला तर त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल. मात्र इतर ठिकाणी युतीत



निवडणुका लढल्या जातील, त्यामुळे संभ्रम बाळगण्याची गरज नाही.'

आगामी निवडणुकांमधील युतीबाबत बोलताना राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले की, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार आहोत, शक्य असेल तिथे युती केली जाईल. मात्र शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढू, यासाठी कार्यकर्त्यांना आतापासूनच तयारीला लागलं पाहिजे.'

भाजप महायुती म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढणार असल्याच्या बावनकुळेच्या विधानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुजोरा दिला आहे. फडणवीस म्हणाले की, 'आमची भूमिका पक्की आहे, महायुती म्हणून आम्ही निवडणुका लढणार आहोत, मात्र एखाद्या ठिकाणी जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल.'

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. अलीकडेच राज्य सरकारने महापालिकांना प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता प्रशासनाकडूनही या निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यामुळे या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

## मुंबई महापालिका जिंकण्यासाठी ठाकरेंनी कसली कंबर

### 12 शिलेदारांच्या खांद्यावर नवी जबाबदारी

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचे आदेश दिल्यानंतर शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तात्काळ १२ शिलेदारांच्या खात्यावर विशेष जबाबदारी सोपवली. ठाकरेंसाठी ही निवडणूक महत्वाची मानली जाते.

मागील २५ वर्षे मुंबईत महापालिकेत शिवसेनेने (ठाकरे) सत्ता राखली. परंतु, पक्षात फूट पडल्यानंतर ठाकरेंची ताकद कमी झाली. संघटनात्मक वर्चस्व पुन्हा राखण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. पक्षाची विधानसभा निहाय बांधणी करण्यासोबतच मराठी मतदार, पायाभूत सुविधा, प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे यांनी १२ नेत्यांच्या खांद्यावर नव्याने जबाबदारी दिली आहे. आमदार सचिन अहिर, मनोज जामसुतकर, माजी आमदार विलास पोतनीस, नेते अमोल किर्तीकर, नितीन नांदगावकर, अरुण दुधवडकर, अशोक धात्रक आदींचा समावेश आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर चार महिन्यांत निवडणुका होणार आहे. निवडणूक आयोगाच्या यंत्रणा याकरिता कामाला लागली आहे. अशातच राज्य सरकारने प्रभाग रचनेचे निर्देश दिले आहेत. प्रभागनिहाय लोकसंख्या, स्थानिक गरजा, प्रशासकीय ढाचा लक्षात घेऊन आराखडा लवकरच तयार केला जाणार आहे. मात्र, ठाकरेंसाठी ही निवडणूक नसून अस्तित्वाची लढाई असणार आहे. त्यामुळे निवडणुकीत मोठा प्रभाव पडावा, यासाठी ठाकरेंनी जोर लावला आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या नावाने बनावट जॉइनिंग लेटर

### मंत्रालयात नोकरी लावण्याचे आमिष

**जळगाव, दि. ११ प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बनावट सहीचे जॉइनिंग लेटर देऊन मंत्रालयात नोकरी लावण्याचे आमिष दाखवत चाळीसगावमधील एका तरुणीची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चाळीसगाव तालुक्यातील तिघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

चाळीसगाव तालुक्यातील सायगाव येथील तरुणीला मुंबई येथील मंत्रालयात क्लार्क पदावर नोकरी लावण्याचे आमिष दाखवण्यात आले. तिच्याकडे देण्यात आलेले जॉइनिंग लेटर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लेटरपॅडवर आणि बनावट सहीसह तयार करण्यात आले होते. त्यामुळे ते खरे असल्याचा भास झाला. मात्र, मुख्यमंत्री कार्यालयाच्या नियमानुसार अशा लेटरवर संबंधित विभागप्रमुख अथवा सचिवांची सही असते, हे लक्षात आल्यावर तरुणीने संशय व्यक्त केला.

याप्रकरणी मुख्य आरोपी सर्वेश प्रमोद भोसले याच्याकडे चौकशी केली असता त्याने खळबळजनक कबुली दिली. त्याने इंटरनेटवर "cm officer letter Maharashtra" असे सर्च करून मिळालेल्या नमुन्यावरून खडकी येथील स्वामी ग्राफिक्सवर रणजीत मांडोळे यांच्या मदतीने बनावट मजकूर तयार केला आणि त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांची नक्कल सही टाकून जॉइनिंग लेटर तयार केल्याचे उघड झाले.

तपासात आणखी एक आरोपी तुषार उर्फ रोहित मधुकर बेलदार याचा देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. या तिघांविरुद्ध चाळीसगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बिहारमध्ये 'आप'ची स्वबळाची घोषणा

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये विरोधकांच्या इंडिया आघाडीला एकामागून एक धक्के बसत आहेत. आता आगामी बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाने स्वबळावर सर्व जागांवर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आपचे नेते सौरभ भारद्वाज यांनी बुधवारी ही माहिती दिली. यामुळे इंडिया आघाडीला आणखी एक धक्का मानला जातोय. बिहारमध्ये आम्ही स्वबळावर निवडणूक लढवत आहोत, पण शेवटी पक्षातील मोठे नेते जो काही निर्णय घेतील, तो आम्ही मान्य करू, अशी प्रतिक्रिया भारद्वाज यांनी व्यक्त केली. दिल्लीमध्ये ज्या पद्धतीने बिहारमधील लोकांचा रोजगार उद्ध्वस्त केला जातोय, त्यांची घरे बुलडोझरने पाडली जात आहेत. असे म्हणता येईल की, बिहारमधील लोकांना बिहारमध्ये परत हाकलून लावले जात आहे. जर भारतीय जनता पक्ष बिहारमधील लोकांना हाकलून लावू शकतो, तर बिहारमधील लोक भारतीय जनता पक्षाला राज्यातून हाकलून लावू शकतात.

## पुण्यातील नव्या प्रभाग रचनेला ठाकरे सेना आणि काँग्रेसचा विरोध

**पुणे, दि. ११ प्रतिनिधी**

मुंबई प्रमाणेच पुण्यातही एक सदस्यीय प्रभागरचना व्हावी. जर चार सदस्यीय प्रभाग रचना आमच्यावर लादली तर आम्ही या निर्णयाविरोधात कोर्टात जाऊ, असा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहराध्यक्ष संजय मोरे यांनी दिला. त्यासोबतच पुण्यातील काँग्रेसने देखील या चार सदस्य प्रभाग रचनेला विरोध केला.



चार सदस्यीय प्रभाग हे महानगरपालिकेमध्ये योग्य नाही. त्याच्या बदल्यात एक सदस्यीय प्रभाग केला पाहिजे. असं केल्यास नगरसेवकाला नीट काम करता येते. भारतीय जनता पक्षाला फक्त सत्ता भोगायची आहे. नागरिकांच्या समस्यांवर त्यांना काम करायचं नाही. आमचा या निर्णयाला विरोध आहे. भारतीय जनता पार्टी मात्र नेहमीप्रमाणे यावेळीही रडीचा डाव खेळणार असं काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी म्हटलंय.

राज्यातील महापालिका निवडणुकीच्या प्रभाग रचनेचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामध्ये पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, वसई विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबिवलीसारख्या महापालिकांचा समावेश आहे.

मुंबई महापालिकेमध्ये जुनेच २२७ प्रभाग कायम असून त्या ठिकाणी एक सदस्यीय प्रभाग असणार आहेत. त्याव्यतिरिक्त राज्यातील इतर महापालिकांमध्ये तीन ते चार सदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्येही बहुसदस्यीय प्रभाग असणार आहेत. पुण्यामध्ये १६२ नगरसेवक असणार आहेत. त्या हिशोबाने प्रभाग रचना करण्यात येणार आहे.

## प्रियांका गांधींना केरळ हायकोर्टाने पाठवली नोटीस

### खोटी माहिती देऊन आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप

**तिरुवनंतपुरम, दि. ११ वृत्तसंस्था**

केरळ उच्च न्यायालयाने बुधवारी काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी-वधेरा यांना नोटीस बजावली आहे. ही नोटीस वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत त्यांच्या विजयाला आव्हान देणाऱ्या याचिकेच्या संदर्भात आहे. न्यायालयाने या याचिकेवर त्यांचे उत्तर मागवले आहे. ही याचिका भाजप नेत्या नव्या हरिदास यांनी दाखल केली आहे. त्यांनी वायनाड मतदारसंघातून प्रियंका गांधींच्या विरोधात निवडणूक लढवली होती. नव्या हरिदास यांचा आरोप आहे की, प्रियंका गांधींनी त्यांच्या उमेदवारी अर्जामध्ये स्वतःची आणि त्यांच्या कुटुंबीयांची संपत्ती योग्यरीत्या जाहीर केली नाही.

नव्या हरिसाद यांचा दावा आहे की, प्रियंका गांधींनी जाणीवपूर्वक संपत्तीची माहिती लपवली, जेणेकरून निवडणुकीचा निकाल प्रभावित होईल. हे वर्तन "भ्रष्ट आचारधर्म" म्हणून गणले जाऊ शकते.

त्यांनी खोटी माहिती देऊन आचारसंहितेचाही भंग केला असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या याचिकेवर पुढील सुनावणी ऑगस्ट महिन्यात होणार आहे. प्रियंका गांधी यांनी निवडणूक अर्जात १२ कोटी रुपयांहून अधिक संपत्ती जाहीर केली होती. त्यांच्याकडे ४.२४ कोटींची चल संपत्ती आणि ७.७४ कोटींची अचल संपत्ती असल्याचे त्यांनी नमूद केले होते.

त्याशिवाय, त्यांनी पती रॉबर्ट वाड्रा यांच्या मालमत्तेचाही तपशील दिला होता. वाड्रा यांच्याकडे एकूण ६५.५४ कोटी रुपयांची संपत्ती आहे, त्यामध्ये ३७.९ 9 कोटींची चल मालमत्ता आणि २७.६४ कोटींची अचल मालमत्ता आहे.

लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी रायबरेली आणि वायनाड या दोन्ही जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर त्यांनी वायनाड जागा सोडली. त्या जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने प्रियांका गांधी यांना उमेदवार म्हणून उभे केले. ही प्रियांका गांधींची पहिली निवडणूक होती.

प्रियांका यांनी सीपीआयचे सत्यन मोकेरी यांना ४ लाख १० हजार मतांनी पराभूत केले. भाजप उमेदवार नव्या हरिदास या १ लाख ९ हजार मतांसह तिसऱ्या स्थानावर राहिल्या. विशेष म्हणजे प्रियांकांनी मताधिक्याच्या बाबतीत भाऊ राहुल गांधींचाही विक्रम मोडला. २०२४मध्ये राहुल गांधींनी या जागेवर सुमारे ३.६५ 65 लाख मतांनी विजय मिळवला होता.

## तिला फाशीची शिक्षा व्हावी त्यासाठी मी वकील उभा करणार - सोनमचा भाऊ

**इंदूर, दि. ११ वृत्तसंस्था**

सोनमचा भाऊ गोविंद याने राजाच्या कुटुंबियांचे सांत्वन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. तो म्हणाला, "मी स्वतः या हत्याप्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा मिळावी यासाठी प्रयत्न करेन". दरम्यान, सोनमचं राज कुशवाहबरोबर प्रेमप्रकरण असल्याच्या बातम्या गोविंदने फेटाळल्या आहेत. गोविंद रघुवंशी म्हणाला, "राज कुशवाह हा आमच्या कंपनीत कर्मचारी होता. त्याचं आणि सोनमचं प्रेमप्रकरण नव्हतं. सोनम त्याला भाऊ मानायची, राजही तिला दिदी म्हणायचा. सोनम त्याला राखी बांधायची. या प्रकरणात आमच्याकडून जी काही मदत होऊ शकते ती सर्व प्रकारची मदत आम्ही करू. मी सोनमविरोधात सर्व काही आवश्यक कारवाई करेन. कारण राजा हा माझा खूप जवळचा मित्र होता. सोनम या प्रकरणात दोषी असेल तर मी तिच्या फाशीच्या शिक्षेची तजवीज करेन". सोनमचा भाऊ म्हणाला, "सोनम असं काहीतरी करणार असल्याची मला थोडी जरी कुणकुण लागली असती तरी मी राजाला वाचवलं असतं. राजा हा आम्हाला आमच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणेच होता. मी स्वतः राजासाठी न्यायालयात वकील उभा करणार आहे. मी सोनमविरोधात लढणार आहे. माझं आणि सोनमचं नातं आता संपुष्टात आलं आहे".

## तीन राज्यांना रेल्वेच्या मल्टीट्रेकिंग योजनेला मंजुरी

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

केंद्रीय कॅबिनेट बैठकीत बुधवारी झारखंड, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील ७ जिल्ह्यांमध्ये भारतीय रेल्वेच्या २ मल्टीट्रॅकिंग योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या या पाऊलामुळे प्रवास सुविधेत सुधारणा होईल. लॉजिस्टिक खर्च कमी होईल. कार्बन डायऑक्साईड उत्सर्जनात घट होईल ज्यातून टिकाऊ आणि कुशल रेल्वे संचालनाला चालना मिळेल. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं की, कोडरमा ते बरकाकाना या दरम्यान १३३ किमी डबल लेनला मंजुरी मिळाली आहे. ज्याचा खर्च ३०६३ कोटी इतका आहे. त्यातून पटणा आणि रांची यांच्यातील अंतर कमी होईल. यामुळे कोडरमा, चतरा, हजारीबाग, रामगड जिल्ह्याला चांगली कनेक्टिविटी मिळू शकते. या प्रकल्पातून निर्माण होणारे कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण सात कोटी झाडे लावण्याइतके असेल. यामुळे देशातील दरवर्षी ३२ कोटी लिटर डिझेलची बचत होईल. याचा फायदा ९३८ गावांना आणि १५ लाख लोकसंख्येला होईल. त्यातून ३०.४ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक होऊ शकते जे रस्त्याने वस्तू पाठवण्यापेक्षा पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून चांगले ठरेल असं त्यांनी सांगितले.

## ट्रेन सुटायच्या 24 तास आधीच तिकीट आरक्षण यादी जाहीर होणार

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

मुंबईसह देशभरात रेल्वे अपघातांची संख्या वाढली आहे. यासह रेल्वे प्रशासनाच्या अपुऱ्या सुविधांमुळे भारतीय रेल्वे विभाग सातत्याने टीकेचा सामना करत आहे. अशातच भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुविधेकडे अधिक लक्ष देत काही बदल करण्याचं ठरवलं आहे. प्रवाशांचा अनुभव अधिक चांगला व्हावा यासाठी भारतीय रेल्वे तिकीट बूकिंग नियमांमध्ये काही बदल करणार आहे. रेल्वे प्रवाशांची रिझर्व्हेशन यादी आता प्रवास सुरू होण्याच्या २४ तास आधी तयार केली जाईल. याचाच अर्थ वेटिंगवर असलेल्या (वेटलिस्टेड) प्रवाशांना आता २४ तास आधीच समजेल की त्यांचं तिकीट कन्फर्म झालंय की नाही. रेल्वेने याबाबतची माहिती देताना म्हटलं आहे की ज्या प्रवाशांचं तिकीट वेटिंगवर असेल त्यांना रेल्वे सुटण्याच्या २४ तास आधी माहिती दिली जाईल की त्यांचं तिकीट कन्फर्म झालंय की नाही. याआधी रेल्वेची कन्फर्मेशन यादी (चार्ट) ट्रेन सुटण्याच्या चार तास आधी जारी केली जात होती. त्यामुळे वेटलिस्टेड प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. कारण तिकीटाच्या पुष्टीसाठी शेवटपर्यंत कोणतीही निश्चित माहिती मिळत नव्हती. मात्र, आता रेल्वे प्रवाशांची चिंता दूर करण्यासाठी प्रशासनाने मोठं पाऊल उचलण्याची तयारी सुरू केली आहे.

रेल्वे प्रशासन करत असलेल्या या बदलामुळे अधिकाऱ्यांना, स्टेशन मास्तरांना,



रेल्वेचं नियोजन करणाऱ्यांना अधिक चांगलं प्लॅनिंग करण्यास मदत मिळेल. किती प्रवाशांकडे कन्फर्म तिकीट आहे, किती प्रवासी वेटलिस्टेड आहेत यासह बरीच माहिती रेल्वे अधिकाऱ्यांकडे २४ तास आधीच उपलब्ध असेल. प्रवाशांची संख्या पाहून रेल्वे प्रशासन इंजिनाला अधिक डबे जोडू शकतं किंवा कमी करू शकतं, प्रवाशांसाठी पुरेशी आसनव्यवस्था करू शकतं. तसेच फलाटांवरील व्यवस्थेकडे लक्ष देऊ शकतं.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने विद्यमान तिकीट प्रणालीत, तिकीट नियमांमध्ये कोणताही बदल केलेला नाही. तत्काळ तिकीट बूकिंग व इतर सर्व आरक्षण प्रक्रिया जैसे थे स्थितीत जारी राहतील. रेल्वेने केवळ एकच बदल केला आहे. केवळ फायनल रिझर्व्हेशन चार्ट तयार करण्याची वेळ बदलली आहे. हा चार्ट पूर्वी ट्रेन सुटण्याच्या ४ तास आधी तयार केला जात होता जो आता २४ तास आधी तयार केला जाईल. ज्यामुळे प्रवाशांना अधिक फ्लेक्सिबिलीटी व पर्याय मिळतील.

# सिन्नर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी कातकाडे; उपाध्यक्षपदी वारुंगसे



**सिन्नर ।** तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी संग्राम कातकाडे, तर उपाध्यक्षपदी अरुण वारुंगसे यांची बिनविरोध निवड झाली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या १३ संचालकांची सोमवारी दिनांक ९ जून रोजी सहाय्यक निबंधक संजय गिते यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक निबंधक कार्यलयात सभा घेण्यात आली.

यावेळी अध्यक्ष पदासाठी कातकाडे व उपाध्यक्ष पदासाठी वारुंगसे यांचे प्रत्येकी एकच अर्ज आल्याने यांची निवड बिनविरोध झाल्याचे सहाय्यक निबंधक गीते यांनी घोषित केले.

यावेळी बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष कातकाडे यांनी फेडरेशनचे उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष देण्यासोबतच सभासद वाढीसाठीही प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. फेडरेशनचे उपाध्यक्ष अरुण वारुंगसे यांनी आपल्या भाषणात सहकाराला बळकटीकरण करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहू, तर सहाय्यक निबंधक गीते यांनी नूतन कार्यकारणीला वसुली अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यासह फेडरेशनचे उत्पन्न वाढविण्याबाबत प्राधान्याने विचार करण्याचा सल्ला दिला. याप्रसंगी श्रीमंत बाजीराव पेशवे पतसंस्थेचे चेअरमन नारायण वाजे, गोदा युनियन सहकारी संस्थेचे चेअरमन लक्ष्मणराव सांगळे, राजेंद्र अंकार, मच्छिंद्र चिने, अनिल पवार, भाऊसाहेब पवार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी फेडरेशनचे संचालक बाळासाहेब आव्हाड, कांताराम माळी, ईलाईबक्ष शेख, कैलास पवार, तेजश्री वाजे, सुमन बोडके, छाया घोलप उपस्थित होते. सहकार अधिकारी नवनाथ गडाख यांनी सहाय्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांताराम माळी यांनी केले.

# पर्यावरण रक्षणाचा, सामाजिक संदेश देत वटपौर्णिमा उत्साहात

**नाशिक ।** वटपौर्णिमेच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद विद्यालय, पंचवटी येथे पर्यावरणपूरक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.पर्यावरण रक्षण, सामाजिक जागरूकता आणि भारतीय संस्कृतीचे जतन करण्याच्या उद्देशाने हरित सेना व इको क्लबच्या विद्यार्थ्यांनी परिसरात जागृती घडवून आणली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपशिक्षक प्रदीपसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांना वटपौर्णिमेचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व तसेच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करत त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे रक्षण का आवश्यक आहे याची माहिती दिली आणि निसर्गाशी सुसंवाद साधण्याचे महत्त्व सांगितले तर विद्यार्थ्यांनी "झाडे लावा, झाडे वाचवा", "सेव्ह नेचर, सेव्ह अर्थ", "पाणी वाचवा", "निसर्ग वाचवा", "बेटी बचाव, बेटी पढाव" यांसारख्या घोषवाक्यांचे फलक




घेऊन परिसरात रॅली काढली. या रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परिसरातील नागरिकांमध्ये सामाजिक व पर्यावरण विषयक जागरूकता निर्माण केली. कार्यक्रमादरम्यान पंचवटी येथील सीता गुंफा परिसरातील वटवृक्षाचे पूजन करणाऱ्या महिलांना प्रसंगी वटवृक्षाच्या रोपांचे वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक किशोर झोटिंग यांच्या हस्ते उपस्थित महिलांना वटवृक्षांची रोपे देण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांनी वटवृक्षाच्या रोपांचे विधीवत पूजन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उपस्थितांना वटवृक्षांच्या रोपांचे वाटप केले सदर उपक्रमासाठि सामाजिक वनीकरण विभागाचे विशाल कुटे, मनपा नवीन नाशिक उद्यान विभागाचे प्रशांत परब, सुरेश तडाखे, बेंडकुळे यांनी रोपे उपलब्ध करून दिली.

कार्यक्रमास मुख्याध्यापक किशोर झोटिंग, सचिन चांगटे, विनोद बैरागी, प्रदीपसिंह पाटील, संदीप देवरे, सुरेखा शिरसाठ, रश्मी ढोबळे तसेच शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिरावणी येथे ३५२ वे शिवशक नववर्ष, शिवराज्याभिषेक सोहळा

**नाशिक ।** छत्रपती शिवरायांचा जेष्ठ शुद्ध त्रयोदशी या शुभ दिनी राज्याभिषेक सोहळा ३५२ वर्षांपूर्वी संपन्न झाला होता.

या राज्याभिषेकाचे स्मरण रहावे म्हणून अष्टप्रधान मंडळ व जनमताच्या आग्रहाने छत्रपती शिवरायांनी विक्रमादित्य संवत्सर, शालिवाहन शके या राजांप्रमाणे स्वतःची शिवशक कालगणना सुरू केली. शिवरायांच्या पश्चात साधारण थोरले बाजीराव पेशवे व इ.स १७७७ या कालखंडापर्यंत स्वराज्याचा कारभार शिवशक कालगणनेनुसार चालत पण १८१८ नंतर इंग्रजांच्या उदयानंतर हि कालगणना विस्मृतीत गेली. ३१ डिसेंबर हे इंग्रजी नववर्ष जनता साजरं



करू लागली पण छत्रपती शिवरायांचे जेष्ठ शुद्ध त्रयोदशीचे नववर्ष साजरे करणे जनता विसरली. हिच गोष्ट हेरून महिरावणी ग्रामस्थांनी प्रथम २०२२ रोजी २५० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर शिवशक नववर्ष साजरे करणारं पहिलं गाव असण्याचा बहुमान पटकावला होता व आज हि शिवशक नववर्ष उत्सवासोबतच शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्याचे चौथे वर्ष आहे.यानिमित्ताने छत्रपती शिवरायांच्या मुर्तीला ग्रामस्थांनी जल व दुग्धाभिषेक, पुष्पहार अर्पण करून औक्षण करून नैवेद्य दाखवला. जेष्ठ शुद्ध त्रयोदशी या दिवशी जो छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा झाला त्या निमित्ताने पूर्ण जगभर अनेक भारतीय हिंदू साम्राज्य दिन या नावाने हा उत्सव साजरा करत असतात.

# वीर जवान संदीप गायकर परिवाराला संत तुकाराम महाराज सप्ताह समितीतर्फे कृतज्ञता निधी

**अकोले ।** जगद्गुरु श्री संत तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी (३७५ वर्ष) सदेह वैकुंठ गमन सोहळा समिती ओतूर व वारकरी संप्रदायाच्या वतीने वीर जवान संदीप गायकर यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयाचा कृतज्ञता निधी सुपूर्द करण्यात आला.

जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे, ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे, ह.भ.प.दीपक महाराज देशमुख, ह.भ.प.राजेंद्र महाराज सदगीर, विनायक तांबे, बाळासाहेब गायकर यांच्या उपस्थितीत वीरमाता सरुबाई गायकर, वीरपिता पांडुरंग गायकर व वीरपत्नी दिपाली गायकर यांच्याकडे हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी (३७५) सदेह वैकुंठ गमन सोहळा समिती श्रीक्षेत्र ओतुर येथे पार पडला. कीर्तनात श्री गुरु बंडातात्या



कराडकर यांनी आपण देशभक्तांचे कृतज्ञता म्हणून काही देणे लागतो, म्हणून सप्ताह पार पडल्यावर निधी शिल्लक राहिल्यास देशाच्या सैन्यासाठी आपण निधी समर्पित करावा असे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत सप्ताहाचे मुख्य मार्गदर्शक ज्ञानेश्वर महाराज कदम छोटे माऊली यांनी मान्य केले. निधी सरकारला देण्याऐवजी सप्ताहाच्या कार्यक्षेत्रातच दहशतवाद्यांसोबत लढताना वीरगतीला प्राप्त झालेल्या वीरजवानाच्या परिवाराला द्यावे असे ठरले. २२ मे २०२५ रोजी जम्मू-काश्मीर मधील किस्तवाड येथे दहशतवाद विरोधी कारवाई दरम्यान अकोले तालुक्यातील करंडी (ब्राह्मणवाडा) गावचे सुपुत्र, शूरवीर जवान संदीप पांडुरंग गायकर यांनी देशासाठी प्राणार्पण केले. यावेळी अकोले तालुका माजी सैनिक संघटनेच्यावतीने शहीद संदीपच्या बलिदानास सलाम केला. शहीद संदीप यांना परत आणता येणार नाही, पण त्यांच्या कुटुंबामागे ठामपणे उभं राहणे आपले कर्तव्य आहे.

सैनिकांच्या समर्पण व त्यागामुळेच देव देश आणि धर्माचे कार्य करता येत असते. त्यांच्या प्रतीची कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने वीर जवान संदीप गायकर यांच्या पश्चात कुटुंबाला आधार म्हणून वारकरी संप्रदायाच्या वतीने ही मदत नाही तर देशभक्ता प्रती व्यक्त करण्यात आली.

यावेळी इंद्रभान कोल्हाळ, संकेत महाराज आरोटे, नितीन महाराज देशमुख, संदीप महाराज थोरात, भीमराव महाराज हांडे यांनी संगीत प्रवचनातून देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून वीर जवान संदीप गायकर यांना श्रद्धांजली समर्पित केली.

## ➤ महत्त्वाचे

### मनपाच्या नाशिकरोड विभागीय अधिकाऱ्यांना युवा सेनेचे निवेदन

**एकलहरे ।** नाशिक महानगरपालिकेच्या नाशिकरोड विभागीय अधिकाऱ्यांना युवा सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. या निवेदनात उद्यानांची झालेली दुरवस्था, कंत्राटदार व अधिकारी यांचा गैरकारभार आदींचा निवेदनात उल्लेख आहे.



नाशिकरोड विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जेलरोड व नाशिकरोड विभाग या परिसरातील नाशिक मनपाच्या उद्यानांची दुरवस्था झालेली असून, ठेकेदारामार्फत कुठल्याही स्वरूपाची देखभाल दुरुस्तीची कामे केली जात नाहीत; परंतु नियमितपणे दरमहा ठेकेदार यांची बिले मात्र पास करून घेतात. यामध्ये उद्यान विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमत असल्याचे विभागीय अधिकारी घुगे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, तसेच सात दिवसांच्या आत योग्य ती कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

### संघर्षातून आशावाद निर्माण होतो : देसाई

**नाशिक ।** जीवन व्यवहारात कित्येकदा संकटे आपली पाठ सोडत नाहीत. मात्र या संकटांना संधी समजून आपण आपल्या आयुष्याचं मार्गक्रमण करत राहावे. संघर्षातूनच आशावाद निर्माण करत जीवन सुंदर बनवले पाहिजे, असे प्रतिपादन झोडगे (मालेगाव) येथील कवी हंसराज देसाई यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्स्वी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित





'पुस्तकावर बोलू काही' उपक्रमात 'बुरुज मनाचे बांधा' या काव्यसंग्रहावर १५१वे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका अलका दराडे होत्या. देसाई पुढे म्हणाले की, पूर्वीच्या काळी प्रत्येक माणूस जिव्हाळ्याची नाती जपत माणुसकी धर्माने वागत होता. आज मात्र माणूसपणाचे बुरूज ढासळू लागले आहेत. अशा विचारातून या संग्रहातील कवितांची निर्मिती झाली. आजची विदारक परिस्थिती कविमनाला बैचेन करते. सुहास टिपरे आणि सोमनाथ साखरे यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले.

# ट्रान्सफॉर्मर गेल्या दीड महिन्यापासून जळाल्याने अंधाराचं साम्राज्य

## नागरिकांनी दिला आंदोलनाचा इशारा...

**मनमाड ।** येथून जवळच असलेल्या पानेवाडी येथील दलित,आदिवासी लोकवस्ती असलेल्या अहिरे वस्तीवरील ट्रान्सफॉर्मर गेल्या दीड महिन्यापासून जळाल्याने वीज पुरवठा खंडित झाला आहे.त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे.त्याचा दुकानदार, शेतकरी आणि शाळेत जाणाऱ्या मुलांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे.त्यामुळे येथे तातडीने पंधरा ऐवजी पंचवीस केव्हीचा ट्रान्सफार्मर बसवून वीज पुरवठा सुरळीत करावा अन्यथा वीज वितरण कंपनीच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा ग्रामपंचायत सदस्या वैशाली आहिरे यांनी दिला आहे.



या ठिकाणी मोठी लोकवस्ती असल्याने शेतकऱ्यांना पिकांना आणि जनावरांचा पाणी प्रश्न निर्माण झाला असून विशेष म्हणजे दळण दळण्यासाठी,मोबाईल फोन चार्जिंग करण्यासाठी आणि रात्री लागणाऱ्या उजेडासाठी बॅटरी चार्ज करण्यासाठी मोठी अडचण ठरत आहे.शेजारील गावात जावे लागत आहे.पावसाळ्याचे दिवस असल्याने आणि त्यातच ट्रान्सफार्मर जळाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.दरम्यान आहिरे वस्ती दीड महिन्यापासून अंधारात आहे. मात्र वीज बिल सात,आठ हजार रुपये येते. आवश्यकता पंचवीस ची आहे परंतु महावितरणाकडे तक्रार केली असता ते उडवा उडवीचे देतात.सदरील वस्ती दलित वस्ती आदिवासी वस्ती असल्यामुळे महावितरण दुर्लक्ष करत आहे. या ट्रान्सफार दलित वस्ती,अहिरे वस्ती,कातकडे वस्ती,पिंगट वस्ती आदी ठिकाणचा लोड असल्यानेर्व हा पंधरा केव्ही म्हणजे कमी दाबाचा ट्रेनसफार्मर तग धरत नाही.यासाठी महावितरणाने उच्च दाबाबचा पंचवीस केव्हीचा ट्रेनसफार्मर लवकरात लवकर बसवून द्यावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा येथील रहिवाशांनी दिला आहे.

# तिसगाव ग्रामपंचायतमार्फत वटपौर्णिमा निमित्ताने वटवृक्ष लागवड

**देवळा ।** वटपौर्णिमेचे औचित्य साधून तिसगाव (ता.देवळा) येथे सरपंच सुलक्षणा राजेंद्र जाधव व ग्रामपंचायत अधिकारी अर्चना हेमंत सोनार आदींसह गावातील काही महिलांनी एकत्र येत गावात वटवृक्षांचे रोपण केले. हा उपक्रम केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून पर्यावरणसंवर्धनासाठी एक छोटंसं पण आश्वासक पाऊल आहे.

वटपौर्णिमा हा सण विशेषतः विवाहित महिलांसाठी खूप महत्त्वाचा मानला जातो. त्या दिवशी स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून आपल्या पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करतात. वडाचे झाड म्हणजे दीर्घायुष्य, नित्यतत्त्व आणि निसर्गाशी नातं यांचं प्रतीक मानलं जातं. वडाचे झाड फक्त धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे नाही, तर पर्यावरणाच्या दृष्टीनेही फार मौल्यवान आहे. हे झाड भरपूर प्राणवायू तयार करतं व जमिनीची आर्द्रता टिकवून ठेवतं आणि पक्षी व प्राणी यांना आश्रय देते. या झाडामुळे गावात थंडावा, सावली आणि हरित वातावरण तयार होतं. आज वटवृक्षांची लागवड करताना प्रकर्षाने जाणवले की आपण धार्मिकतेच्या



जोडीने पर्यावरणाची जबाबदारीही निभावली पाहिजे. जे झाड पूर्वी पूजलं जायचं, ते आजही आपल्याला शुद्ध हवा आणि आरोग्य देतं. त्यामुळे प्रत्येक वटपौर्णिमेला एक वडाचं झाड लावलं, तर आपल्या पुढच्या पिढीला हरित, समृद्ध आणि निरोगी जीवन आपण देऊ शकतो.

सदर कार्यक्रमासाठी उपसरपंच दिपक आहेर, ग्रामपंचायत सदस्य अरविंद आहेर, उमाकांत आहेर, प्रविण आहेर, दशरथ गायकवाड, स्वप्नाली देवरे, अर्चना आहेर, भिमाबाई ठाकरे, चंद्रभागा पवार, पुष्पा पवार तसेच सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव, पोलीस पाटील उत्तम आहेर, अंगणवाडी सेविका सुनंदा वाघ, निर्मला आहेर, ग्रामपंचायत कर्मचारी शरद आहेर, भाऊसाहेब आहेर, नारायण वाघ, सचिन पवार यांनी विशेष सहकार्य केले. या वर्षी गावात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड व संगोपन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वटपौर्णिमेच्या निमित्ताने "चला, आपण सर्व मिळून प्रत्येक सणाला एक झाड लावू आणि आपलं गाव सुंदर, स्वच्छ व हरित बनवू" असे आवाहन ग्रामपंचायत अधिकारी अर्चना सोनार यांनी केले.

# पिंपळगावला 'न समजलेले आई-बाप' विषयावर व्याख्यान

**पिंपळगाव बसवंत ।** जोपर्यंत आई बापाचा श्वास सुरू आहे तोपर्यंत आई बापावर भरभरून प्रेम करा. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांना जीव लावा. त्यांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा. त्यांना कडकडून मिठी मारा. एकदा की आई बापाचा हात डोक्यावरून उठला की जग परक आणि पोरकं होत. मग तुम्ही करोडो रुपये कमवून सुद्धा देवाच्या चरणावर ओतले तरी गेलेला बाप अन आई परत येत नाही. भिंतीतील फोटोतून ते तुम्हाला जीव लावायला येणार नाही हे वास्तव आहे. त्यामुळे उभ्या आयुष्यात अनेक खस्त्या खाल्लेल्या त्या आई बापाच्या कष्टाची जाण ठेवत त्यांना कधी लाचार अन अपमानित करू नका. त्याच्यावर भरभरुन प्रेम करत त्यांना जपा असे विचार सुप्रसिद्ध व्याख्याते प्रबोधनकार प्रा. वसंत हंकारे यांनी व्यक्त केले.

पिंपळगाव शहरात छत्रपती



शिवराज्याभिषेक दिनानिमित्त एबी फाउंडेशनच्या वतीने चिंचखेडरोड परिसरात 'न समजलेले आई- बाप' या विषयावर प्रा. हंकारे बोलत होते. यावेळी एबी फाउंडेशनचे संचालक बापूसाहेब पाटील, अल्पेश पारख, भाजपचे जिल्हाध्यक्ष यतीन कदम, माजी सरपंच अलका बनकर, सतीश मोरे, गणेश बनकर, किरण लभडे, सत्यजित मोरे, पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी, शीतल मोरे, सुरेश पारख,दत्तात्रय काळे, संदीप झुटे,मदन घुमरे, मयूर गावडे, प्रवीण मोरे, प्रशांत घोडके, आशिष विधाते, राहूल विधाते, दीपक मोरे, वैभव सरोदे, प्रवीण उगले, सागर तांबोळी, संगम गांगुर्डे, आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

वसंत हंकारे पुढे म्हणाले, मुला-मुलींच्या आयुष्यात फक्त एकच देव आहे, तो म्हणजे आपला बाप आणि एकच देवी आहे, ती म्हणजे आपली आई. आपल्या एखाद्या कृत्याने आई-बापाची मान खाली जाईल असे कृत्य आपल्या हातून घडणार नाही याची काळजी युवकांनी घेत व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. आजची युवा पिढी आयपीएलचे रन मोजतात, त्यांचा हिशेब ठेवतात, ज्या आई-बापाने आपल्याला जन्म दिला, मोठे केले, अंगा-खांद्यावर खेळवले, त्या बापाने आपल्यासाठी किती रन काढले आहे. याचा हिशेब आपण कधी करणार आहोत? असा प्रश्न त्यांनी उपस्थित करत ३० वर्षानंतर आई माहरी जाताना घर तेच, अंगण तेच, मात्र अंगणात बापाची चप्पल दिसत नाही. मायेने मुके घेणारी ती माउली आता दिसत नाही, हे वास्तव आहे. आई-बापाची किंमत त्या पोराला विचारा ज्याचे आई बाप लहानपणी सोडून गेले.

अनाथ आश्रम शाळेत जाऊन अनुभवा त्या आई बाप नसलेल्या लेकरांची व्यथा. त्यामुळे आई बाप आहे तोपर्यंत त्यांच्यावर प्रेम करा. त्यांची काळजी घ्या, त्यांची मान खाली जाईल असे कृत्य करू नका असे आवाहन हंकारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी एबी फाउंडेशन, अभिनव कला क्रीडा मंडळ, मित्र फाउंडेशन, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठाण पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# सिव्हिल हॉस्पिटलमध्ये औषध खरेदीत मोठा भ्रष्टाचार

## आश्चर्य : संदर्भ रुग्णालयात कमी दराने घेतलेली औषधे सिव्हिलमध्ये मात्र चढ्या दराने खरेदी









**नाशिक ।** सिव्हिल हॉस्पिटलच्या औषध खरेदीमध्ये देखील सिव्हिल सर्जन शिंदे यांचा पन्नास टक्क्यांचा मलिदा दिला जातो, त्यानंतर औषध खरेदीची प्रक्रिया राबवली जात असल्याचे पुखराज जैन यांनी त्यांच्या तक्रारीत म्हंटले आहे. धक्कादायक बाब म्हणजे संदर्भ रुग्णालयात अल्प दरात खरेदी केलेली औषधे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मात्र चढ्यादराने खरेदी केली जात असून दोन्ही आस्थापनांमध्ये औषध खरेदी प्रक्रियेमध्ये असलेल्या तफावतीचा प्रकार गंभीर असून वरिष्ठांनी या प्रकरणी एसआयटी नेमून चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

सिव्हिल हॉस्पिटल मधील औषध खरेदीचा ठेका वादग्रस्त ब्लॅकलिस्टेड गेटवेल डिस्ट्रीब्यूटर यांना देण्यात आला असून सिव्हिल सर्जन शिंदे हे नंदुरबार येथे कार्यरत असल्या पासून ही मंडळी सिव्हिल सर्जन यांचे पाठीराखे असल्यासारखे वावरत आहेत. या कंपन्यां मध्ये शिंदे यांची ५० टक्क्यांची भागीदारी असल्याचा आरोप जैन यांनी केलेला असताना जिल्हा रुग्णालयात सुरू असलेली कामे आणि औषध पुरवठा याच ठेकेदारांना देण्यात आल्याने तांत्रिक कामाचा अनुभव नसतानाही ब्लॅकलिस्टेड ठेकेदारांना इतकी मोठी कामे कशी दिली जातात असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याबाबत सिव्हिल सर्जन शिंदे यांच्या भूमिकेबाबत संशय घेतला जात आहे.




दरम्यान औषध पुरवठ्याची कामे देखील याच कंपन्यांना दिली असून औषध खरेदीत मोठा भ्रष्टाचार होत असल्याचे उघड झाले आहे. त्या संदर्भात जैन यांनी केलेल्या तक्रारी संदर्भ रुग्णालयाची औषधे अत्यंत कमी दरात खरेदी केली जातात तीच औषधे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये मात्र चढा दाराने घेतली जात असल्याची गंभीर तक्रार असून यामध्ये देखील शिंदे यांची भागीदारी असल्याचा आरोप जैन यांनी केला आहे. शिंदे सोबत असलेले पुरवठादार हे निकृष्ट दर्जाच्या उपकरणाचा पुरवठा करत असून उपचार घेणाऱ्या गोरगरीब जनतेची फसवणूक केली जात असल्याचे बोलले जाते.





बोगस आणि निकामी उपकरणांची छायाचित्र यापूर्वी देखील माध्यमांवर प्रसिद्ध झाली होती. याविरुद्ध अनेकदा तक्रार देऊन सुद्धा शिंदे यांचे मामा माजी केंद्रीय मंत्री असल्याने शिंदे यांच्या विरोधात कुठलीही कारवाई केली जात नसल्याचा आरोप जैन यांनी केला आहे. दरम्यान या प्रकरणी सिव्हिल सर्जन शिंदे यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता ते परदेशात असल्याचे समजते त्यांना व्हाट्सअप द्वारे मेसेज देखील केला मात्र त्यांनी कुठलाही प्रतिक्रिया दिला नाही.

> या गंभीर प्रकरणी प्रस्तुत प्रतिनिधीने जिल्हा शासकीय रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांची कुठलीही प्रतिक्रिया मिळाली नाही. किंबहुना व्हाट्सपच्या माध्यमातून त्यांना संदेश देऊन प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी अप्रत्यक्षरीत्या प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली.

**जिल्हा शासकीय रुग्णालया-संदर्भात कुठलीही तक्रार असल्यास दै. महासागर, 0253- 4513384 यावर संपर्क साधावा.**

# भूमाफियांना पोलिसांकडून अभय

## ख्रिश्चन बांधवाकडून पोलीस आयुक्तालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न





**नाशिक ।** डायोसेशन ट्रस्ट भूखंड घोटाळ्याच्या संदर्भात ख्रिश्चन बांधवांच्या संयमाचा बांध अखेर फुटला असून या प्रकरणात सक्रिय असलेल्या भूमाफियां विरुद्ध तक्रारी करून देखील पोलीस कोणतीच दखल घेत नसल्याने भूमाफियांची दादागिरी वाढली आहे, त्यामुळे पोलीस यंत्रणेचे लक्ष वेधण्यासाठी तीमथी दहातोंडे या तक्रारदाराने परवा पोलीस आयुक्त कार्यालयासमोर अंगावर रॉकेल टाकत आत्मदहनाचा प्रयत्न केला आहे. या प्रकारानंतर पोलिसांची एकच धावपळ उडाली. त्यांनी तीमथी यांना ताब्यात घेतले आहे. पोलीसांनी भूमाफियां विरुद्ध गुन्हे दाखल न केल्यास ख्रिश्चन समुदायाकडून अशाच पद्धतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

डायोसेशन ट्रस्ट, ख्रिश्चन समुदायाची विश्वस्त संस्था असून सन २०१६ मध्ये अजय श्रीवास्तव याने संस्थेच्या विश्वस्त मंडळात बेकायदेशीर घुसखोरी करून ट्रस्टचे कोट्यवधी रुपयांची भूखंड विक्री करण्याचा सपाटा लावला होता. या प्रकरणी श्रीवास्तव आणि त्याच्या कुटुंबीयांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी श्रीवास्तवला जामीन मंजूर करताना डायोसेशनच्या मिळकतीबाबत कुठलीही फेरफार करायची नसल्याचे आदेश कोर्टाने दिले असताना दोन वर्षांपूर्वी त्याने विपुल लाठीशी संगणमत करत ट्रस्टचे मोक्याच्या ठिकाणचे भूखंड विक्री केले.

### डायोसेशन ट्रस्टचा भूखंड घोटाळा

यातील बहुतांश भूखंड विपुल लाठीने त्याच्या मित्रांच्या आणि नातलगांच्या नावावर करून घेतले आहेत.ते सर्वच गैर ख्रिश्चन असून हा सर्वच प्रकार बेकायदेशीर असल्याचे आरोप झाल्यावर लाठी आणि श्रीवास्तव यांच्या विरुद्ध मुंबईनाका आणि सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले मात्र कोट्यवधी रुपयांची फसवणूक झालेली असतानाही या प्रकरणी पोलिसांनी त्यांना अटक न करता जामीन मिळण्यासाठी अप्रत्यक्षरीत्या मदत केली. जामीनावर सुटल्या नंतर या भूमाफियांनी कायद्याची तमा न बाळगता वर्षानुवर्ष ट्रस्टशी करारनामा करून भूखंड घेऊन त्या ठिकाणी घरे बांधून राहत असलेल्या गरीब ख्रिश्चनांना नोटीसा देऊन खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी धमकावले आहे.

या प्रकारानंतर ख्रिश्चन बांधवांनी पोलिसांकडे अनेक तक्रारी केल्या मात्र पोलिसांनी या तक्रारींची दखल न घेतल्याने ख्रिश्चन बांधवांच्या सहनशीलतेचा बांध फुटल्याने तीमथी दहातोंडे यांनी थेट पोलीस आयुक्तालयासमोर अंगावर रॉकेल टाकत आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्यांना पोलिसांनी वेळीच आवरल्याने पुढील अनर्थ टाळला. मात्र ख्रिश्चन बांधवांमध्ये आंदोलनाची धग कायम आहे. पोलिसांनी वेळीच या प्रकरणी कारवाई न केल्यास सामुदायिक आत्मदहनाचा इशारा ख्रिश्चन बांधवांनी दिला आहे. त्यामुळे आता तरी पोलीस कारवाई करतील का असं सवाल उपस्थित केला जात आहे.

# डायोसेशनच्या भूखंडप्रकरणी नाशकातील प्रतिष्ठित बिल्डरांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा




**नाशिक ।** सन १९९० पासून पोलीस आयुक्त, नाशिक यांच्या ताब्यात असलेली मालमत्ता नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या नावे असल्याचे दाखवत, शहरातील प्रतिष्ठित बिल्डरांनी संगनमताने सुमारे ३०० कोटी रुपये किमतीची ही मालमत्ता बनावट कागदपत्रांच्या आधारे विकल्याचा घोटाळा समोर आला आहे. या प्रकरणात नाशिक डायोसेशन कौन्सिलचे विश्वस्त, मालमत्ता खरेदी करणारे आणि खोट्या दस्तऐवजांना संमती देणारे असे एकूण ३० हून अधिक जणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

या सर्वांनी मिळून खोट्या माहितीतून खोटे दस्तावेज तयार केले, शासनाच्या महसूल, गृह, नगरविकास, विधी व न्याय विभागांना फसवले आणि पोलीस आयुक्त कार्यालयाच्या ताब्यातील मालमत्तेवर कब्जा मिळवून ती खाजगी विक्रीद्वारे अन्य व्यक्तींना विकल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी शहरातील प्रतिष्ठित बिल्डरां विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पंकज प्रभाकर मालपुरे पिंकेश भूपेंद्र शहा,प्रविण पंडित उन्हवणे, माधुरी अरुण पाटील, कविता मधुकर पाटील,राजेंद्र रसिकलाल शहा ,संदीप चंद्रकांत सराफ (हरियाली ॲग्रीकल्चर्स), राजेंद्र मनोहरदास ठक्कर (ठक्कर डेव्हलपर्स),नेमीचंद पोद्दार (नवरत्न लँड्स अँड इस्टेट्स / निर्माण आश्रय डेव्हलपर्स) तसेच विश्वस्त मंडळातील अविनाश बलकुंदी (चेअरमन),डॉ. मनोहर हनबरहट्टी ,सुगंध शिंदे, रेव्ह. नरेंद्र शिंदे,रेव्ह. प्रदीप कांबळे,डॉ. अरविंद मोरे, मार्गरिट गांगुर्डे भास्कर साळवे, फ्रान्सिस डेव्हिड जॉन, शशिकांत वंजारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तीनशे कोटींचा घोटाळा

> डायोसेशन भूखंड प्रकरणांमध्ये गेल्या एक-दोन वर्षांमध्ये अनेक बेकायदेशीर घडामोडी घडल्या आहेत. काही भूमाफियांनी बेकायदेशीररित्या डायोसेशनच्या विश्वस्त मंडळात घुसखोरी करून डायोसेशनच्या मौल्यवान भूखंडांची विक्री केली होती. याप्रकरणी चार ते पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या भूमाफियांनी बेकायदेशीर पद्धतीने जवळपास ३० भूखंडाची विक्री केली आहे. याबाबत पोलिसांनीच न्यायालयामध्ये जबाब दिलेला आहे. असे असताना आयुक्तालयाच्या जागेसाठी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे तर इतर भूखंडांच्या बाबतीत गुन्हा दाखल का होत नाही असा सवाल उपस्थित केला जात आहे.

> शरणपूर रोड येथील जुने पोलीस आयुक्त कार्यालयाचा भूखंड हा नाशिक डायोसेशन ट्रस्टच्या मालकीचा असून पोलिसांना हा भूखंड भाडेतत्त्वावर देण्यात आला आहे. ज्या बिल्डरां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी सन २००० मध्ये धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेऊनच या भूखंडासंदर्भातील खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्याचे काही जाणकारांचे म्हणणे आहे.

या सगळ्या आरोपींनी एकत्र येत शासनाची दिशाभूल करून, खोटी कागदपत्रे तयार करून पोलीस आयुक्त कार्यालयाच्या ताब्यातील जागेचा भाडे महसूल हडप केला. शिवाय, ती मालमत्ता खासगी विकासकांना विकून ३०० कोटींचा आर्थिक फायदा मिळवण्याचा डाव आखण्यात आला.

या प्रकरणाची सखोल चौकशी झाली तर अनेक शासकीय अधिकाऱ्यांचाही सहभाग उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## ➤ महत्त्वाचे

### दिवा प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर





**नाशिकचे संपादक सुभाष सबनीस, व्यंगचित्रकार ज्ञानेश बेलेकर यांचा विशेष सन्मान**

**नाशिक ।** महाराष्ट्रातील दिवाळी अंकांच्या संपादकांची संस्था असलेल्या 'दिवा प्रतिष्ठान' च्यावतीने घेण्यात आलेल्या 'दिवा वाचक स्पर्धा-२०२४ चे' पुरस्कार जाहीर करण्यात आले असून नाशिक येथील सुभाषित या विनोदी दिवाळी अंकाचे सुभाष सबनीस आणि ज्येष्ठ व्यंगचित्रकार ज्ञानेश बेलेकर यांचा सन्मान करण्यात येणार आहे. इतर पुरस्कार पुढीलप्रमाणे क्रमांक एक (विभागून) स्नेहल संजय पोटे- बेळगाव, सायली वैद्य, मुंबई. क्रमांक दोन (विभागून) डॉ. प्रभाकर शेळके, जालना, रेखा नाबर, मुंबई. क्रमांक तीन (विभागून) प्रज्ञा जांभेकर, सायन मुंबई, श्रद्धा वझे, कल्याण. सदर पुरस्कारांचे वितरण नाशिक येथे येत्या १५ जून रोजी दुपारी दोन वाजता भावबंधन मंगल कार्यालय, पंचवटी येथे नाशिक कवीचे अध्यक्ष इंजि. बाळासाहेब मगर, ज्येष्ठ साहित्यिक नरेश महाजन आणि कुसुमाग्रज मराठी विचार मंचचे अध्यक्ष सतीश बोरा यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंद्रकांत शेवाळे, उपाध्यक्ष भारतभूषण पाटकर, कार्याध्यक्ष सुनिल उंब्रजकर आणि कार्यवाह विवेक मेहेत्रे यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# मनमाडजवळ पाइपलाईन फोडून पेट्रोल चोरी करणारी टोळी गजाआड

## ग्रामीण पोलिसांची कामगिरी । ८ आरोपी निष्पन्न; ५ जणांना अटक



**नाशिक ।** मनमाड शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अनकवाडे शिवारात मुंबई-मनमाड-बिजवासन उच्चदाब भुयारी पेट्रोलियम पाइपलाईनला छिद्र पाडून पेट्रोल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात ग्रामीण पोलिसांना यश आले असून या प्रकरणी एकूण ५ जणांना अटक करण्यात आली आहे. तिघे फरार आहेत.

याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. ६ मे २०२५ रोजी भारत पेट्रोलियमचे प्रबंधक अनुज धर्मराव यांच्या तक्रारीवरून मनमाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

पोलीस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि गुप्त बातमीदाराच्या आधारे सापळा रचत सुनील उर्फ सोनू जयशंकर तिवारी वय ३५ वर्ष रा. कल्याण, कथुरायन उर्फ कार्तिक रामकृष्ण मुदलियार वय ३८ रा. म्हाडा कॉलनी गोवंडी मुंबई, मोहम्मद मकसूद अब्दुल वाहिद शेख वय ४० रा. गोवंडी मुंबई, इरफान याकूब मोमीन रा. जमदाडे चौक मनमाड नांदगाव, काकासाहेब शिवराम गरुड रा.अनकवाडे मनमाड यांना अटक केली असून. आरोपींवर यापूर्वी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या टोळीने पाइपलाईनला क्लॅम्प व व्हॉल्व्ह बसवून पेट्रोल-डिझेल चोरी केली. चोरी केलेले इंधन नेमके किती होते, ते कोठे विकले, यासाठी पोलीस तपास सुरू आहे.

या कारवाईत मनमाड पोलीस स्टेशनच्या पथकासह तांत्रिक विश्लेषण शाखेनेही विशेष योगदान दिले. सदर तपासात पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक तेघबीर सिंग संधू, उपविभागीय अधिकारी बाजीराव महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली मनमाडचे पोलीस निरीक्षक विजय करे, सहाय्यक पोलीस निरीक्षक कौशल वाघ, पोलीस हवालदार राजेंद्र केदारे, पंकज देवकाते, प्रल्हाद सानप, अशोक व्यापारे, पोलीस कॉन्स्टेबल संदीप झाल्टे, रंजीत चव्हाण, राजेंद्र खैरनार, तांत्रिक विश्लेषण शाखेचे हेमंत गिलबिले, पोलीस नाईक प्रदीप बहिरम यांनी तपास केला.

# बच्चू कडू यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी; अन्यथा आंदोलन



**देवळा ।** शेतकरी, कष्टकरी कामगार, दिव्यांग महिला व अन्य वंचित कर्जमाफी घटकांच्या हक्कासाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली क्षेत्र गुरुकुंज मोझरी येते दिनांक ८ पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. परंतु राज्य शासनाने आंदोलनात असलेल्या रास्त मागण्या पाहता अद्याप पर्यंत कुठलीही दखल न घेतल्याने नाराजी व्यक्त करत बुधवारी दि ११ रोजी देवळा तालुक्यातील प्रहार दिव्यांग संघटना तसेच मित्रपक्षांच्या वतीने कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दर्शविला. दरम्यान राज्य शासनाने या आंदोलनाची दखल न घेतल्यास दिव्यांग संघटनेच्या वतीने शुक्रवारी दि १३ रोजी देवळा येथील शिव स्मारकाजवळ येऊन आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला असून, या संदर्भात तहसीलदार डॉ. मिलिंद कुलकर्णी व पोलीस निरीक्षक सार्थक नेहेते यांना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर केले.

यावेळी खर्डे येथील प्रहार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष कृष्णा जाधव, शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) गटाचे विलास शिंदे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष राजेंद्र शिरसाठ, दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष माधव शिरसाट, समता परिषदेचे आबा खैरनार, लहुजी शक्ती सेनेचे दीपक पानपाटील, दीपक देवरे, विजय जैन, रघुनाथ मोरे, बापू अहिरे आदी उपस्थित होते.

# मेक इन इंडियाचा डिफेन्समध्ये धमाका

गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात मोठा बदल दिसून आला. भारताची संरक्षण नीती केवळ सुरक्षे इतपत मर्यादीत नाहीत. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता, नवकल्पना, जागतिक स्पर्धेत भारताने सशक्त पाऊल टाकले आहे. भारतीय संरक्षण क्षेत्राकडे जग नव्या दृष्टिकोनातून पाहात आहे. केंद्र सरकारची रणनीती, मजबूत इच्छाशक्ती आणि भविष्यासाठीची धोरण यासाठी कारणीभूत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण क्षेत्रातील उत्पादनात आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भरतेला अधिक महत्त्व दिले आहे.

--------------------



भारताच्या संरक्षण अर्थसंकल्पात मोठी वाढ झाली आहे. २०१३-१४ मध्ये हे बजेट २.५३ लाख कोटी होते. ते २०२५-२६ या वर्षात वाढून ६.८१ लाख कोटी रुपये इतके झाले. हा केवळ एक आकडा नाही. तर भारताची सुरक्षा, तांत्रिक प्रगती आणि आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने मोठे पाऊल आहे.

भारताने संरक्षण उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. २०२३-२४ मध्ये देशाने १.२७ लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन केले होते. तर २०१४-१५ मध्ये ४६,४२९ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. म्हणजे या काळात १७४% हून अधिकचा खर्च वाढला आहे.

**स्थानिक उद्योगांचा मोठा वाटा**

संरक्षण क्षेत्रात आता खासगी कंपन्या आणि स्टार्टअप्स पण मोठी भूमिका निभावत आहेत. संरक्षण उत्पादनात स्वदेशीचा नारा उपयोगी ठरला आहे. त्यामुळे विविध उपकरणांचे उत्पादन वाढणार आहे. संरक्षण मंत्रालयाने २०२४-२५ मध्ये २.०९ लाख कोटींचे १९४ संरक्षण करार केले होते. त्यातील १७७ करार हे स्थानिक उद्योग आणि स्टार्टअप्सला मिळाले आहेत. हा एक विक्रमच म्हणावा लागेल.

**औद्योगिक कॉरिडॉरमध्ये वाढली गुंतवणूक**

उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण औद्योगिक कॉरिडोरमध्ये बदल होत आहे. आतापर्यंत इंडस्ट्रीयल कॉरिडोरमध्ये ८,६५८ कोटींहून अधिकची गुंतवणूक झाली आहे. २५३ पेक्षा अधिक टङ्कव वर स्वाक्षरी झाली आहे. येत्या काळात ही गुंतवणूक ५३,४३९ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

सरकारने आतापर्यंत ५ सकारात्मक स्वदेशी विषय सूची तयार केल्या आहेत. यामध्ये ५५०० अधिक वस्तूंचा समावेश आहे. यामध्ये ३००० हून अधिक संरक्षण उत्पादनं ही आता स्वदेशी आहेत. यामध्ये दारुगोळा, गन, असॉल्ट रायफल, हलके लढाऊ विमानं, रडार आणि चिलखती वाहनांसारख्या तांत्रिकदृष्या अत्याधुनिक प्रणालींचा समावेश आहे.

**संरक्षण निर्यातीत विक्रमी झेप**

देशातील संरक्षण क्षेत्र केवळ उत्पादनापुरतं मर्यादित राहिलेलं नाही, तर संशोधन, नवकल्पना आणि जागतिक निर्यातीच्या दिशेनं सुसंगत वाटचाल सुरू आहे. यामध्ये iDEX सारख्या नवाचारी उपक्रमांनी आणि सरकारच्या दृढ धोरणांनी क्रांती घडवली आहे.

त्यासाठी आतापर्यंत ४३० हून अधिक iDE करार करण्यात आले आहेत. भारताने संरक्षण क्षेत्रात नव प्रणाली, तंत्रज्ञानाच्या वापरासाठी २०१८ मध्ये iDE (इनोवेशन फॉर डिफेन्स एक्सिलेंस) ची सुरुवात केली होती. संरक्षण दलाने या प्रणालीशी संबंधित २,४०० कोटींहून अधिक खरेदी केली आहे. त्यासाठी २०२५-२६ या वर्षात ४४९.६२ कोटींचे बजेट निश्चित करण्यात आले आहेत.

**निर्यातीत नवीन विक्रम**

भारताच्या संरक्षण क्षेत्राने मोठी कात टाकली आहे. २०१३-१४ मध्ये ६८६ कोटींची निर्यात झाली होती. त्या तुलनेत २०२४-२५ मध्ये २३,६२२ कोटींची निर्यात वाढ दिसून आली. म्हणजे दहा वर्षाहून अधिकच्या काळात संरक्षण क्षेत्रातील निर्यात ३४ पट वाढली आहे. २०२९ वर्षापर्यंत ही निर्यात ५०,००० कोटींवर पोहचेल.

एकूणच काय तर संरक्षण क्षेत्रात गेल्या ११ वर्षात भारताने उत्तुंग भरारी घेतल्याचे दिसून येते.

■ ■ ■

# कामगार लढ्याचा इतिहास

नारायण मेघाजी लोखंडे यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला, मागणी रेटून धरली, दि.९ जून १८९० रोजी ती मंजूर करून घेतली आणि दि.१० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली. जी आजपर्यंत चालू आहे. गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी. दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी. या मागण्या मान्य करून घेतल्या.

----------------

रविवार हा आठवड्यातील एक वार आहे. सोमवारपासून मोजला तर हा आठवड्यातील शेवटचा, म्हणजे सातवा दिवस येतो. भारतात हा वार रवीचा म्हणजेच सूर्याचा दिवस समजला जातो. त्यामुळे याला आदित्यवार (आदित्य=सूर्य) किंवा बोली भाषेत आइतवार म्हंटले जाते आणि इंग्रजीत संडे. ज्या ज्या देशावर कधी काळी ब्रिटिश सत्ता होती, त्या त्या देशात रविवार हा सुट्टीचा दिवस असतो. शिक्षणसंस्था, कार्यालये आणि बँका या दिवशी बंद असतात.



एके काळी भारतात कामगारांना रविवारची सुट्टी नसे. नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत १८८४ मध्ये बॉबे मिल हॅंड्स ही भारतातली पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी त्या काळच्या फॅक्टरी कमिशनकडे अनेक मागण्या केल्या. त्यातली रोजच्या कामातली अर्ध्या तासाची जेवणाची सुटी आणि रविवारची साप्ताहिक सुट्टी या दोन महत्त्वाच्या मागण्या होत्या. त्यासाठी २४ एप्रिल १८९० रोजी हजारो कामगारांचा मोर्चा निघाला होता.

अखेर ९ जून १८९० रोजी प्रस्तावाला मंजूरी देवून १० जून १८९० पासून दर रविवारची सुट्टी देण्याचे गिरणी मालकांनी सुरू केले. २०१५ साली १० जूनला या रविवारच्या सुट्टीचा १२५ वा वर्धापन दिन साजरा झाला. पुण्यात रविवार हा मिसळवार म्हणून ओळखला जातो.

पाश्चात्त्य कल्पनेप्रमाणे आठवड्याचा पहिला वार परंतु व्यावहारिकदृष्ट्या शेवटचा वार. या वाराचे नाव बहुतेक सर्व देशांत सूर्यवाचकच आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रीय कल्पनेनुसार या दिवशीच्या सूर्योदयापासून पहिल्या होऱ्याचा अधिपती सूर्य असतो. जगात सर्व ठिकाणी सूर्याला देवताच मानतात.

जैन धर्मात नऊ वर्षे केले जाणारे एक व्रत आषाढमासाच्या शेवटच्या रविवारपासून पुढे ९ रविवार चालते. मुसलमान बांधव दर चांद्रमासातील पहिल्या रविवारी मंत्र-तंत्र करतात. काही ख्रिस्ती पंथ रविवार हा प्रभूच्या प्रार्थनेचा व विश्रांतीचा दिवस म्हणून पाळतात. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा साप्ताहिक स्मृतिदिन म्हणून सर्वच ख्रिस्ती लोक रविवार हा प्रार्थनेचा दिवस पाळतात.

कॉन्स्टंटाइन या सम्राटांनी आज्ञापत्र काढून रविवार हा सुटीचा दिवस ठरविला. ईस्टरच्या अलीकडचा रविवार पामसंडे म्हणून प्रसिद्ध आहे. ख्रिस्तांचा जेरूसलेममध्ये विजयी प्रवेश झाला, तेव्हा त्यांच्या मार्गावर पामवृक्षाच्या फांद्या पसरल्या होत्या. म्हणून याला पामसंडे म्हणतात. रविवार विशेष शुभ मानला जात नसल्याने कोणताही उपक्रम या दिवशी सुरू करीत नाहीत. मात्र या दिवशी दृष्टिदोष दूर करणारी यंत्रे वापरून उपचार करण्यास हरकत नसते, असे मानतात.

रावबहाद्दुर नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७) हे भारतातील कामगार संघटना चळवळीचे जनक होते. १९ व्या शतकात कापड गिरणीच्या कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठीच नव्हे तर जातीय आणि सांप्रदायिक मुद्द्यांवर त्यांनी केलेल्या धाडसी पुढाकारासाठीही त्यांची आठवण ठेवली जाते.

याशिवाय सन १८९५ मध्ये हिंदू-मुस्लिमांदरम्यान झालेल्या दंगलीत केलेल्या कामाबद्दल त्यांना रावबहादूर ही पदवीही देण्यात आली होती.

तत्कालीन ब्रिटिश भारत सरकारने त्यांना जस्टिस ऑफ पीस हा सन्मान देऊन सन्मानित केले होते. भारत सरकारने २००५ मध्ये त्यांच्या छायाचित्रासह एक टपाल तिकीट जारी केले.

नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा जोतिराव फुले यांचे प्रमुख सहकारी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील कण्हेरसर येथील माळी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण हायस्कूलपर्यंत झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई होते. गोपीनाथ नावाचा त्यांना एक मुलगा होता.

१८७४ मध्ये माहिती मिळाल्यानंतर ते सत्यशोधक चळवळीचे सदस्य झाले. सन १८८० पासून त्यांनी मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दीनबंधूचे व्यवस्थापन हाती घेतले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर त्यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली.

तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात दिवसातून १३-१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले; त्यांना आठवड्याची सुट्टीही मिळत नसे; परिणामी लोखंडे यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले.

त्याकरिता ते कामगार वस्तीतच राहू लागले. त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना बॉम्बे मिलहॅंड्स असोसिएशन २३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली आणि समाजसेवेत स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील ट्रेड युनियन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्यासह महात्मा फुले यांनी मुंबईतील कापड कामगारांच्या सभांनाही संबोधित केले.

त्यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला आणि ९ व १० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली जी आजपर्यंत चालू आहे. एन.एम.लोखंडे यांच्यामुळे गिरणी कामगारांना मिळालेले काही हक्क हे होते.

गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी.

दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी.

मिलच्या कामाला सकाळी साडेसहा वाजल्यापासून सुरुवात करावी आणि सूर्यास्तानंतर बंद करावी.

कामगारांचे पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत करावेत.

ब्रिटिश राजवटीने त्यांना रावबहादूर ही पदवी बहाल केली होती. त्यांनी मुंबई कामगार संघ स्थापन केला. कष्टकरी वर्गाने एकजुटीने अन्यायाचा कडाडून प्रतिकार केला पाहिजे, अशी सशक्त प्रेरणाच ते आज ठरले आहेत.

फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न कोणत्याही संघटनेने केला नाही, हे विशेष!



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

# मुलगी श्रीमंत घरी खरंच सुखी राहील का?

आजकाल प्रत्येक आई वडिलांना वाटते की, आपली मुलगी श्रीमंत घरातील श्रीमंत मुलाला द्यावी. म्हणजे श्रीमंत घरी आपली मुलगी चैन विलासात राहील. तिला कोणत्याच गोष्टीची कमतरता भासणार नाही. तिला सर्व भौतिक सुख-सुविधा जाग्यावर उपलब्ध होतील.

ती ऐश्वर्यसंपन्न व राणीसारखे जीवन जगेल. सर्व भौतिक सुख-सुविधा तिच्या पायावर लोळण घेतील. समाजात व गावात आपली प्रतिष्ठा वाढेल. भावकीत व गावकीत मोठ्या अभिमानाने सांगता येईल की, माझी मुलगी खूप मोठ्या घरी दिली आहे. तिच्या घरी अमाप पैसा व संपत्ती आहे. अलिशान गाडी व अलिशान बंगला आहे.तिच्या घरात नोकर चाकर आहेत. तिच्या घरी कोणतीच व कशाचीच कमी नाही. असे नातेवाईकांना व भावकीला ठणकावून सांगण्यासाठी आणि आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढावी म्हणून प्रत्येक आई वडील आपल्या मुलींना श्रीमंत घरी देण्याचे स्वप्न पाहत आहेत.

पण त्यासाठी तो मुलगा दारुडा व व्यसनी आहे का? आपल्या मुलीला खरंच सुखी ठेवेल का? का दारू पिऊन आपल्या मुलीला रोजच त्रास देईल? या गोष्टीचा विचार करणे हे प्रत्येक आई-वडिलांचे परम कर्तव्य आहे. केवळ मुलगा श्रीमंत आहे म्हणून कोणताही मागचा पुढचा विचार न करता मुलीला त्या घरी देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे.

पण आजकाल तेवढा विचार कोण करतोय? केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या मुलीला मनपसंत श्रीमंत स्थळ बघतोय. आणि आपल्या मुलीचे लग्न एकदाचे उरकून टाकतोय. म्हणूनच आजकाल समाजात व गावात आपल्या मुलीला श्रीमंत घरी देण्याची प्रत्येक आई-वडिलांची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. त्यासाठी मुलींचे बिचारे आई-वडील दिवसभर शेतात जीवाचे रान करतात. वीट भट्टीची किंवा उसाची उचल घेऊन पैसा गोळा करतात, नसेल तर सावकाराचे कर्ज काढतात आणि ऐपत नसताना देखील केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलाला मनमानी हुंडा देऊन आपल्या मुलीला मोठ्या घरी देतात.

सोनं नाणं देऊन मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात. लग्न राजेशाही थाटात लावून देतात. लग्नाला गाव जेवण देतात. सर्व पाहुणे रावळे बोलावतात. आणि आपली व आपल्या मुलीची एकदाची हौस पूर्ण करतात. मुलगी नवऱ्या घरी नांदायला जाते. एक-दोन महिने नवरा व सासू-सासरे तिला चांगली वागणूक देतात. पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळतात. तिला खूप खूप जीव लावतात.

तिकडे मुलीचे आई-वडील मात्र आता आपली मुलगी सुखाने व आनंदाने नांदत आहे म्हणून समाधानी असतात. त्या दोघांचा संसार सुखाने चालत असतो. पण त्यांच्या सुखी संसाराला कोणाची कुठून व कशी नजर लागते हे कळायला मार्ग नसतो. त्या मुलीचा नवरा दारुडा व व्यसनी निघतो. तिथूनच मुलीचा मानसिक व शारीरिक छळ सुरू होतो.

तिच्या बावनकशी चारित्र्यावर संशय घेतला जातो. तिला नाहक नावे ठेवून बदनाम केले जाते. नवरा रोज दारू पिऊन येतो आणि तिला मारहाण करतो. तिला घाण घाण शिव्या देऊन तिच्या भावना दुखावतो. तुझ्या आई-वडिलांनी मला लग्नात काय दिले? तुझ्या आई वडिलांनी मला लग्नात खूप कमी हुंडा दिलाय. आता आणखीन हुंडारुपी म्हणून काहीतरी पैसे किंवा गाडी घेऊन द्यायला सांग. नाहीतर तू आमच्या घरातून निघून जा आणि तुझ्या आई-वडिलांकडेच जाऊन रहा. इकडे आमच्याकडे येऊ नकोस. अशा मागणीचा तगादा मुलीकडे लावतात, छळ करून तिला घरातून बाहेर काढतात आणि माहेरचा रस्ता दाखवतात.

ती बिचारी मुलगी मात्र आपल्या आई-वडिलांकडे जाते. आणि त्यांना सर्व हकीकत सांगते. तेव्हा आई-वडिलांना हे ऐकून खूप खूप दुःख वाटते. मुलीच्या आई वडिलांच्या मनात तर वेगळ्याच अपेक्षा राहतात. पण इथे तर वेगळेच काहीतरी होऊन जाते. त्यांच्या पायाखालची जमीन सरकते. त्यांना आभाळ फाटल्यासारखे होते. एवढे अतोनात दुःख त्यांना होते. आणि मग ते पश्चातापात पडतात. स्वतःला दोष देत बसतात.

आता आपल्याला समाज काय म्हणेल? भावकी व नातेवाईक काय म्हणतील? या विचारांनी ते हतबल होतात. हे प्रकार सध्या सर्वत्र सुरू आहेत. नुकतेच घडलेले वैष्णवी हगवणे प्रकरण सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. हे आपल्याला माहित आहे. वैष्णवी हगवणे हिला तिच्या आई-वडिलांनी मायंदळ हुंडा देऊन तिला श्रीमंत घरी दिले होते. पण श्रीमंत घरी तिच्यावर तिच्या नवऱ्याने व सासू-सासऱ्याने कसा अमानुषपणे मानसिक व शारीरिक छळ केला. हे आपण जाणून आहोत.

आई-वडिलांना चांदीचे भांडे घेऊन द्यायला सांग म्हणून तिच्यावर वांरवार अमानुषपणे अत्याचार केला जात होता. नाहक तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बदनाम केले जात होते. या रोजच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून तिने आपली जीवनयात्रा संपवली. ही महाराष्ट्राला हादरवून टाकणारी घटना आहे. याचा प्रत्येक आई-वडिलांनी जरूर विचार करावा.

मुलगी श्रीमंत घरी दिल्यावरच सुखी राहते हा आई-वडिलांचा गैरसमज आहे. हा गैरसमज प्रत्येक आई-वडिलांनी मनातून काढून टाकावा. आपली मुलगी श्रीमंत घरी द्या किंवा गरीब घरी द्या याला माझा विरोध नाही. पण मुलगी केवळ श्रीमंत घरीच सुखी राहील हे मीच काय? कोणीही सांगू शकत नाही. जो मुलगा निर्व्यसनी व होतकरू आहे आणि आपल्या मुलीला आयुष्यभर चांगल्या प्रकारे जीव लावून सांभाळू शकतो अशाच निर्व्यसनी, होतकरू व चारित्र्यसंपन्न मुलाला आपली मुलगी जरूर द्या. तो आपल्या मुलीला राणी सारखा ठेवेल...त्यांच्या सुखी संसाराला कोणाचीच नजर लागणार नाही. आणि श्रीमंत घरी द्याल तर आपल्या मुलीचे वैष्णवी हगवणे प्रकरण झाल्याशिवाय राहणार नाही... एवढे ध्यानात ठेवा...

--------------

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर, जि. लातूर**
**७४९८७१५६६१**

■ ■ ■

# लाडक्या बहिणींसाठी दारूधोरण





**दिपक कैतके**
**मुंबई.**

माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता वेळेवर देण्यासाठी आता राज्य सरकारने दारूबंदेलाच नवा अर्थ दिला आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच सर्व प्रकारच्या मद्यावर तब्बल ५०% पेक्षा अधिक करवाढ करून महसूलवाढीचा दारूचा उपाय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीत दरवर्षी सुमारे १४ हजार कोटी रुपये भर पडणार असून, परकीय मद्यावर तर ७० टक्क्यांपर्यंत दरवाढ करण्यात आली आहे.

**लाडक्या बहिणींसाठी खडखडाट मग दारूपट्टीचे टॉनिक!**

राज्य सरकारने महिलांसाठी जाहीर केलेल्या माझी लाडकी बहीण योजनेसाठी दरमहिना १५०० रुपये आणि भविष्यात २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र, या योजनेसाठी लागणाऱ्या ३५ ते ४० हजार कोटींच्या वार्षिक खर्चामुळे सरकारला आर्थिक तंगीतून मार्ग काढावा लागतो आहे. परिणामी, राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारूच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ करण्याचा निर्णय घेतला आणि मंत्रिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केलं.

**देशी-विदेशी मद्यावर एकदम हैवाना दरवाढ**

| मद्य प्रकार | जुना दर (१८० मि.ली.) | नवा दर | वाढ (%) |
|---|---|---|---|
| देशी दारू | रू.७० | रू.८० | १४% |
| महाराष्ट्रात निर्मित दारू | रू.१४८ | – | |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य | रू.१२० | रू.२०५ | ७०% |
| प्रिमियम विदेशी मद्य | रू.२१० | रू.३६० | ७०% |

सर्वसामान्य ग्राहकांपासून प्रिमियम ब्रँडचे चाहते सर्वांनाच याचा फटका बसणार असून, मुंबईतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्समध्ये विदेशी मद्य विक्रीसाठी १५% अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. बीयर मात्र यापासून वगळण्यात आली आहे, कारण देशात सर्वाधिक बीयर दर आधीच महाराष्ट्रातच आहेत.

**दारूपासून आता राज्याच्या तिजोरीत भरभरून राजस्व**

सध्या उत्पादन शुल्क व दारू विक्रीतून राज्याला ४५ हजार कोटींचा वार्षिक महसूल मिळतो. आता नव्या दरवाढीनंतर हा महसूल ६० हजार कोटींवर जाण्याची शक्यता आहे. यामुळे राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या १० टक्क्यांहून अधिक वाटा केवळ दारू विक्रीतून मिळणार आहे.

**विभागीय बळकटी व एआय नियंत्रण**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या यंत्रणेसाठी ७४४ नवीन पदे व ४७९ पर्यवेक्षक पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच एआय प्रणालीद्वारे संपूर्ण मद्य उत्पादन-साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी एकात्मिक नियंत्रण कक्ष स्थापन केला जाणार आहे. महायुती सरकारच्या महिलांसाठीच्या लोकप्रिय योजनेला आर्थिक बळ देण्यासाठी राज्यातील दारू प्रेमींना आता अधिक मोल मोजावे लागणार आहे.

एका बाजूला लाडक्या बहिणींची काळजी, दुसऱ्या बाजूला दारूचे वाढते दर – हे सध्याच्या सरकारचे नवे आर्थिक समीकरण ठरू लागले आहे.

# रेल्वेचा पुढाकार, शिक्षण क्षेत्र मागे का?

**वाचक लिहितात**

छत्रपती शिवाजी महाराज केवळ भारतीयांचेच नव्हे, तर परदेशातही आराध्य आहेत. अनेक देशांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिवरायांची युद्धनीती, राज्यनीती इत्यादींचा समावेश आहे. शिवाजी महाराज केवळ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर ते कुशल प्रशासक, पराक्रमी योद्धा आणि दूरदृष्टी असलेले शासक होते. ते जनकल्याण आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहेत.

त्यांची युद्धनीती, शासनपद्धती आणि धर्मनिरपेक्ष धोरण आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या जीवनातून आणि कायार्तून विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्य यांसारखी मूल्ये शिकायला मिळावी. या उद्देशाने मुंबई येथून ह्यभारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे.

ही गाडी महाराष्ट्रात ५ दिवस फेरफटका मारणार असून रायगड, प्रतापगड, पन्हाळा अशा ऐतिहासिक गडांच्या जवळच्या रेल्वेस्थानकांवर तसेच शिवरायांच्या इतिहासाशी संबंधित अन्य ऐतिहासिक स्थळांजवळ थांबणार आहे.या अभिनव उपक्रमासाठी भारतीय रेल्वेचे अभिनंदन! रेल्वे विभागाने शिवचरित्र प्रचारासाठी पुढाकार घेतला आहे, पण शिवरायांचा वसा पुढील पिढीमधे रुजविण्यासाठी शिक्षण क्षेत्रानेही पुढाकार घेण्याची वेळ आली आहे.

केवळ राज्य सरकारच नव्हे, तर केंद्र सरकारनेही प्राथमिक इयत्तेपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंत शिवाजी महाराजांचे जीवन, कार्य व पराक्रम यांचा समावेश अभ्यासक्रमात करावा, ही सर्व शिवप्रेमींची इच्छा आहे.

■ **दीपक जमनारे, वर्धा.**

# नसांमध्ये साचलेले खराब कोलेस्ट्रॉल होईल कमी



आजकाल उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या सामान्य झाली आहे. लोकांची बदलती जीवनशैली तसेच खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे ही समस्या उद्भवते. शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात. हृदयरोग, मज्जातंतूंचे आजार, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारखे गंभीर आणि जीवघेणे आजार होऊ शकतात. त्यामुळे शरीरात वाढत्या कोलेस्टेरॉलची समस्या वेळीच नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे.

वाढत्या कोलेस्टेरॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जीवनशैलीत काही बदल करणे आणि आहार सुधारणे आवश्यक आहे, अनेक प्रकरणांमध्ये यासाठी औषधे घ्यावी लागतात. मात्र काही घरगुती उपायांच्या मदतीने शरीरात साठलेले खराब कोलेस्टेरॉल बाहेर काढू शकतात.

उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या असेल, तर ते नियंत्रित करण्यासाठी स्वयंपाकघरात असलेली एक पांढरी गोष्ट वापरावी लागेल.

**लसूण कोलेस्ट्रॉल साफ करेल**

वाढत्या कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी लसूण वापरू शकता. यासाठी लसूण तुपात भाजून खावा लागेल. तूप आणि लसूण एकत्र कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. लसणात असलेले अँटी-ऑक्सिडंट्स आणि तुपात असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. याशिवाय, तुपात भाजलेला लसूण आरोग्यासाठी बरेच फायदे प्रदान करते.

जर पचनाच्या समस्या असतील तर लसूण फायदेशीर ठरेल. विशेषतः तुपामध्ये ते भाजून खाल्ल्याने पचनाच्या समस्या दूर होण्यास खूप मदत होते. यामुळे बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त यापासूनही आराम मिळतो. लसणात असे अनेक पोषक घटक आढळतात जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने हृदयाशी संबंधित आजार दूर राहतात.

तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ते शरीराचे संसर्गापासून संरक्षण करते. तसेच लसणात असलेले अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म तुपासोबत मिसळल्यास सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळतो.

**पुरुषांसाठी फायदेशीर**

तुपात भाजलेले लसूण पुरुषांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. नियमित सेवन केल्यास टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढते आणि शुक्राणूंची संख्या वाढते.

■ ■ ■

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# डोळस विचार

अरे डोळस बांधवांनो
अंधांच्या समस्यांची
ठेवा थोडी जाणीव
बंद डोळ्याने चालून पहा
समजेल तुम्हा उणिव ...

असेल दृष्टी तर
दिसेल सृष्टी
म्हणवा नाही खोटा
मरणोत्तर नेत्रदान करून
अंधांना दृष्टी देण्यात
सांगा काय आहे तोटा ?














## शब्दकोडे क्रमांक २१३५




आडवे शब्द :-
१) वृषभाचा सण
३) इंदिरा गांधीजींच्या नाव
७) देशाचे नाणे
९) मुलीचा नवरा
१०) सामान
११) व्यय
१२) गोंधळून जाणे
१४) चेष्टा
१६) आश्चर्य
१७) एक चतुर्थांश भाग
१८) अन्न, जेवण, गिळंकृत करणे
१९) जपान देशाचे चलन
२१) थोडक्यात महानगरपालिका
२३) माळी
२४) थंड
२५) गीत म्हणणे
२६) जहाज
२७) काल व उद्या मधील दिवस
२८) ताबडतोब(हिं )
२९) विशेष
३२) दुलई
३५) उगाच
३६) अनेकांच्या हाती असलेली सत्ता, गोंधळ
३९) गावाखालची जमीन
४१) धमनी
४२) चांदी
४४) अंबाड्यासारखी एक तंतुमय वनस्पती
४५) लापशी, दुधाचा एक गोड पदार्थ
४७) दही घुसळून केलेले पेय
४८) व्रत
४९) उसनवार
५२) भांडण, दुही
५३) मोठी उथळ वाटी
५४) तफावत, भेद
५५) जनक
५७) गुणांची कदर करणारा
६०) रेडा, कोकिळ
६२) तमाशातील आख्यान
६४) जिव्हा
६६) आपला देश
६८) सारथी
७१) नष्ट, नासाडी ७२) ऐट, दिमाख
७३) मरेपर्यंत
७४) न्यूनता, चणचण
७५) समीक्षा, विरोधी अभिप्राय

उभे शब्द :-
१) निर्बुद्ध माणूस
२) आगमन होणे
३) एक बारीक धान्य
४) खराब
५) लक्ष्मी
६) संगोपन
७) ख्रिश्चनांचे प्रार्थनास्थळ
८) श्रेष्ठ पुरुष
९) राबता, वहिवाट
११) गुप्तपणे चर्चा करण्याची जागा
१३) माल साठविण्याची जागा
१५) दारूचा एक प्रकार
१७) पुष्पदल
२०) एक मोठे चर्मवाद्य
२२) नगरात राहणारा
२४) ज्याला कशाचीही पारख नाही असा
२५) समुद्राच्या लाटांचा आवाज
२७) जनकजननी
३०) प्रभात
३१) रणात, युद्धात धीट असलेला
३३) धन्यवादाचा एक शब्द
३४) अकस्मात
३५) दुधाचे दह्यात रुपांतर करणारा घटक
३७) कासोटा, ओटी, खोकला
३८) हमाल
४०) लाकूड कापण्याचे हत्यार
४३) वेळूचे, किंवा गहू, जव यांचे सत्व
४६) गप्प बसण्याचे व्रत
४७) घाई त्वरा
५०) मंत्रीमंडळ, शासन – कर्त्यांचा समूह
५१) शेत, कुरण, मळा
५३) खळबळजनक
५४) अगदी छोटा भाग
५६) बारीक, मऊ केस
५८) दयाळू
५९) दरवाजा
६१) सदोदित
६३) तृण
६५) नासलेला
६६) गवताची पेंढी
६७) शरीर
६९) सत्ता
७०) नूतन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




आज का अंदाज
गुरूवार १२ जून २०२५
पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | ३३० | १३३ | ११८ | ४५५ | ४४७ | १३४ | १४४ |
| ४९० | ४४८ | २२३ | ५७८ | २४८ | ११३ | २६० | ५६८ |
| ५८० | २५९ | ३७७ | ६७७ | ३४६ | ६९० | ३७८ | ४७८ |
| ३२ | ६२ | ७५ | ०५ | ४३ | ५३ | ८१ | ९१ |
| ३४ | ६४ | ७८ | ०८ | ४६ | ५६ | ८२ | ९२ |
| ३० | ६० | ७९ | ०९ | ४७ | ५७ | ८० | ९० |

१२ जून : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५७ | ८७ |
| १४ | २४ | ५९ | ८९ |
| १६ | २६ | ५३ | ८३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.
प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४



# नाशिकमध्ये पहिली अखिल भारतीय मराठी भाषा-संस्कृती परिषद : ॲड. नितीन ठाकरे

## कुसुमाग्रज मराठी विचार मंच-मविप्रतर्फे आयोजन

**नाशिक ।** मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' साज मिळाला खरा, परंतु, राजभाषा, लोकभाषा, ज्ञानभाषा, व्यवहार भाषा अलंकार प्राप्त होणे आवश्यक आहे. सजग, स्वाभिमानी समाज निर्मितीसाठी, संस्कृती रक्षण आणि अस्मिता संगोपनासाठी आपल्या मराठी मातृभाषेच्या पदराचे कवच आवश्यक आहे. एकूणच मराठी भाषेचा विविधांगी अभ्यास व्हावा, यावर सखोल विचारमंथन व्हावे, म्हणून नाशिकमध्ये कुसुमाग्रज मराठी विचार मंचाच्या पुढाकाराने प्रथमच 'अखिल भारतीय मराठी भाषा-संस्कृती परिषद' आयोजित करण्यात आलेली आहे. अशी माहिती मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्था या परिषदेसाठी बहुमूल्य सहकार्य व आवश्यक ती मदत करणार आहे, असेही ठाकरे म्हणाले. मराठा विद्या प्रसारक समाजाच्या कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृह आणि आयएमआरटी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये शनिवार दि. ९ आणि रविवार दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी ही पहिली वहिली मराठी भाषा-संस्कृती परिषद होणार आहे. यासंदर्भात मविप्रच्या मध्यवर्ती कार्यालयात मंगळवारी (दि. १०) आयोजित पत्रकार परिषदेसाठी मंचाचे अध्यक्ष सतीश बोरा, उपाध्यक्ष दिलीप बारवकर, सरचिटणीस सुभाष सबनीस, आनंद देशपांडे, खजिनदार जयप्रकाश मुथा, शिरीष देशपांडे, विश्वस्त नंदकिशोर ठोंबरे उपस्थित होते. या दोन दिवसीय परिषदेमध्ये विद्वत विचारवंत, समाजहितैषी, मराठी भाषा अभ्यासक, तत्त्ववेत्ते यांच्या वैचारिक घुसळणाने मराठी भाषा विषयक समाज जागृतीचे नवनीत काढण्याचा प्रयत्न होणार आहे. या परिषदेसाठी तमाम मराठी भाषा प्रेमींचे सहकार्य सर्वार्थाने व्हावे, अशी अपेक्षा सतीश बोरा, सुभाष सबनीस तसेच ॲड. नितीन ठाकरे यांनी व्यक्त केली. या परिषदेमध्ये विविध विषयांवर जसे की, मराठीच्या अवनतीची कारणे, मराठी आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, विकास उन्नतीच्या संधीची भाषा कधी होणार?, मराठीच्या उन्ततीसाठी शासनाची भूमिका, मराठी माध्यमातून शिक्षण आवश्यक का आहे?, विभागीय साहित्य संस्था आणि मराठी भाषा, मराठीच्या उपाययोजनाच्या क्षेत्रांची सद्यस्थिती, बृहन्महाराष्ट्रातील मराठी समाज आणि वास्तव, विदेशातील मराठी, मराठी आणि इतर भाषांचा समन्वय आणि अनुवाद, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात मराठी विषय का नाही? आपल्या सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा, मराठी सक्तीचा कायदा आणि त्याच्या अंमलबजावणीची वस्तुस्थिती, माध्यमांमधील मराठी, मराठी भाषिकांची मराठी बाबतची उदासीनता, मराठीसाठी काय करावे? भाषाविज्ञान हा विषय उपेक्षित का आहे?, साहित्यकेंद्री शिक्षणाऐवजी भाषाकेंद्री शिक्षणाची भाषा शिक्षणाची गरज, संस्कृतीची बदलती संकल्पना, भाषा आणि संस्कृती – संबंध, संस्कृती आणि लोकसंस्कृती, मराठी भाषा आणि बृहन्महाराष्ट्रातील संस्कृती, धर्म आणि संस्कृती परस्परसंबंध, या आणि अशा अनेक विषयांवर चर्चा सत्र, गटचर्चा, परिसंवाद, व्याख्याने तसेच मराठी संस्कृतीविषयक विविध कार्यक्रम, कवी संमेलन आयोजित करण्यात येणार असून. या भाषेच्या घुसळणातून निघणारे तथ्य ग्रंथरूपाने प्रसिद्ध करून एक महत्वाचा दस्तऐवज या आणि यापुढील पिढीतील मराठी भाषा अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न कुसुमाग्रज मराठी विचार मंच संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. मराठी भाषा विषयक ठोस कार्यक्रम म्हणून हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत असून ही परिषद याच उपक्रमाचा पुढचा टप्पा आहे. असे विविध उपक्रम नियमितपणे करण्याचा प्रयत्न सुरूच राहणार आहेत. लवकरच परिषदेचे अध्यक्ष, स्वागताध्यक्ष तसेच उदघाटन आणि समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ठरविण्यात येणार आहेत, असे सतीश बोरा आणि सुभाष सबनीस यांनी सांगितले.



### लवकरच कार्यक्रम पत्रिकेला अंतिम स्वरूप

या परिषदेमध्ये संपूर्ण भारतातील मराठी भाषेचे अभ्यासक, विचारवंत आणि मराठी भाषेचा आग्रह धरणारे आणि नाशिक जिल्ह्यातील मराठी भाषेसाठी कार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांचा सहभाग असणार आहे. याबाबत अनेक मान्यवरांशी बोलणे झाले असून, काही विचारवंतांशी बोलणे सुरु आहे. लवकरच कार्यक्रम पत्रिकेला अंतिम स्वरूप देण्यात येणार आहे. परिषदेच्या उद्घाटनास राज्याचे मुख्यमंत्री, मराठी भाषा मंत्री, सांस्कृतिक मंत्री, शालेय शिक्षणमंत्री तसेच उच्चशिक्षणमंत्री यांना आमंत्रित केले जाणार असून, मराठी भाषेविषयी तळमळ असणाऱ्या विविध राजकीय पक्षांतील मान्यवर, अभ्यासकांनासुध्दा आमंत्रित केले जाणार आहे.

### मराठीचे उपासक करण्याचा उपक्रम

तीन लाख मराठीचे उपासक तयार करण्याचा मानस कुसुमाग्रज मराठी विचार मंचच्या माध्यमातून इयत्ता चौथी ते आठवी या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढावी आणि त्यांनी खास करून मराठी वाचावे, यासाठी तयार केलेल्या पुस्तकाच्या माध्यमातून परीक्षा घेण्यात येते. प्रत्येक विद्यार्थ्याला 'मराठीचे उपासक' असे प्रशस्तीपत्र देण्यात येते. जानेवारी २०२५ पासून अकरा हजार विद्यार्थ्यांना उपासक ही पदवी प्रदान करण्यात आलेली असून, या शैक्षणिक वर्षामध्ये तीन लाख मराठीचे उपासक तयार करण्याचा मानस आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

# गोदावरीतील प्रदूषण रोखण्यासाठी यंत्रणांनी कार्यवाही करावी : डॉ. गेडाम


## मलनिस्सारण, सांडपाणी, औद्योगिक कचरा, पानवेली, अतिक्रमण अधोरेखित




**नाशिक ।** गोदावरी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी गतीने कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या. नदीपात्रात होणारे अतिक्रमण रोखावे तसेच नदीपात्रात सांडपाणी मिसळणार नाही यासाठी करावयाच्या ठोस उपाययोजनांना गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. मलनिस्सारण, सांडपाणी, औद्योगिक कचरा, पानवेली, अतिक्रमण याकडे गंभीरपणे बघण्याच्या सूचनाही गेडाम यांनी केल्या.

गोदावरी नदी प्रदूषणाबाबत नियुक्त समितीची मंगळवारी (दि. १०) विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख तसेच राजेश पंडित, निशिकांत पगारे, जगबीर सिंग हे अशासकीय सदस्य उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. गेडाम म्हणाले की, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व यंत्रणांनी कार्यवाही करावी. आगामी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने गोदावरी नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी विविध यंत्रणांनी त्यांची जबाबदारी वेळेत पार पाडणे आवश्यक आहे. नदीतील पाणवेली काढण्याबाबत सर्व पर्यायांचा विचार व्हावा. यांत्रिक पद्धतीने पानवेली काढणे अथवा मनुष्यबळ वापरून संबंधित नदी क्षेत्रातील प्राधिकरणाकडे ती जबाबदारी सोपविणे यासह इतरही पर्यायाबाबत महापालिका, जिल्हा परिषद, नाशिक महानगरपालिका विकास प्राधिकरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जलसंपदा, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आदी यंत्रणांनी विचार करावा. नदीपात्रात काही व्यावसायिक आस्थापनांकडून कपडे धुण्यासाठी काही खासगी यंत्रणेला कामे दिले जातात. ही यंत्रणा नदीपात्रात कपडे धुवून नदी पात्र प्रदूषित करण्याची कामे करत आहेत. महानगरपालिका आणि पोलिस यंत्रणेने अशा खाजगी यंत्रणेवर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील मलनिस्सारण प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने गतीने कार्यवाही करावी. प्रकल्प पूर्ण करण्यात येणाऱ्या सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय बाबी तसेच ना हरकत प्रमाणपत्र यांची पूर्तता करावी, असे निर्देशही डॉ. गेडाम यांनी संबंधित यंत्रणेला दिले. औद्योगिक क्षेत्रातील होणाऱ्या प्रदूषणाबाबत ते उभारण्यात येणारा औद्योगिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करावी. त्या क्षेत्रातील रहिवास क्षेत्रासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत महापालिकेला एमआयडीसीने सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. नदीकिनारी मोकळ्या जागेत जिल्हा परिषद आणि महानगर पालिका यांनी विविध उपक्रम राबवावेत. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. नदी किनारी कोणत्याही प्रकारे अतिक्रमण होणार नाही आणि हा परिसर प्रदूषित होणार नाही यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

# गोसावी तंत्रनिकेतनमध्ये दहावीनंतर तंत्रज्ञानाशी जोडणारा ब्रिज कोर्स



**एकलहरे ।** नाशिकरोड येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतनच्या वतीने ब्रिज कोर्स घेण्यात येत आहे. ब्रिज कोर्स हि संकल्पना इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी अस्तित्वात आणली आहे. असे महाविद्यालयाचे प्रकल्प अधिकारी प्रा. प्रदीप देशपांडे यांनी सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. श्रद्धा देशपांडे यांनी सदर कोर्स संदर्भात विस्तृत माहिती दिली. महाविद्यालयाच्या प्रांगणात संगणक अभियांत्रिकीशी संबंधित लँग्वेजेस, अँप डेव्हलोपमेंट, एम एस ऑफिस अश्या विविध विषयांचे प्राथमिक ज्ञान दिले जात आहे. तसेच विद्युत अभियांत्रिकी संबंधित सर्किट्स, आयसीज, करंट, वायरिंग यासंदर्भात; स्थापत्य अभियांत्रिकीमार्फत बिल्डिंग प्लॅनिंग, स्ट्रक्चर, बीम, कॉलम, ब्रिजेस अश्या विविध विषयांसंबंधी तसीच यांत्रिकी अभियांत्रिकी द्वारे मशिनरीज, वर्कशॉप टूल्स अश्या विविध साधनसामग्रीची ओळख प्रात्यक्षिके करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती हि त्यांचा तंत्रज्ञानाविषयीचा कल दर्शवत आहे. विद्यार्थ्यांना विविध तंत्रविषयक माहिती बरोबरच सर्वांगीण विकासासाठी स्पोर्ट्सचेही आयोजन वेळोवेळी केले जात आहे.

# नांदगाव तालुक्यातील सोयगाव ग्रामपंचायतीत घोटाळा

## बनावट जन्म प्रमाणपत्र प्रकरणी ग्रामसेवक अडचणीत



**नांदगाव ।** तालुक्यातील सोयगाव ग्रामपंचायती मध्ये २०१७ मध्ये बनावट जन्म प्रमाणपत्र दिल्या प्रकरणी तत्कालीन ग्रामसेवकावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करणारी तक्रार समोर आली आहे. भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा नांदगाव शहराध्यक्ष अभिषेक विघे यांनी एक एप्रिल २०२५ रोजी गट विकास अधिकारी पाठक यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार स्वराज्य निकम यांना ९ नोव्हेंबर २०१७ रोजी ग्रामसेवकाने जन्म दाखला दिला. परंतु २०१७ च्या रजिस्टर मध्ये याबाबत कोणतीही नोंद आढळली नाही. नांदगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पाठक यांनी या प्रकरणी गंभीर दखल घेत तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत.




नांदगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी पाठक यांनी नांदगाव तालुक्यातील सोयगाव ग्रामपंचायतीला लेखी अहवाल सादर करण्यास सांगितले असून सदर दाखला कोणत्या आधारावर दिला गेला याची पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच २२ जानेवारी २०१७ ते २० डिसेंबर २०१७ या कालावधीत कोण ग्रामसेवक कार्यरत होते, याची देखील माहिती मागवली आहे. अभिषेक विघे यांनी बोलताना सांगितले की, शासनाची फसवणूक करणारी गंभीर बाब आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. गट विकास अधिकारी पाठक यांनी या प्रकरणाला आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. या प्रकरणामुळे सोयगाव ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून चौकशीतून सत्य बाहेर येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जात, धर्म विसरून केलेली मदत आयुष्यभर स्मरणात राहते!

## बिहारच्या बहीण-भावांकडून ऋणनिर्देश व्यक्त





**नाशिक ।** आजपासून सतरा वर्षांपूर्वी म्हणजे २००८ मध्ये एक दिवस संध्याकाळच्या वेळेस येथील डॉ. झाकीर शेख आणि ॲड. अशोक दळवी सिन्नरवरून नाशिकला येत असताना चेहेडीच्या पुलावर त्यांच्या गाडीच्या पुढेच एक भीषण अपघात झाला होता. एका डांबरच्या टँकरने सुमो गाडीला समोरासमोर धडक दिली होती. त्यात सुमो चालक जागेवरच मृत झाला. बाकीचे सहाजण गंभीर जखमी झालेले होते. अशावेळी अनेक वाहने आजूबाजूने निघून जात होते. परंतु मदत करण्याच्या हेतूने डॉ. शेख व ॲड. दळवी यांनी मात्र गाडीच्या खाली उतरून मदतीला सुरुवात केली.

या अपघातातील मृत झालेला सुमो चालक हा नागापूर (मनमाड) येथील असल्यामुळे डॉ. शेख यांनी नागापूरला संपर्क करून त्या ड्रायव्हरची डेडबॉडी त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिली आणि उर्वरित जखमी लोकांना शताब्दी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. हे सर्व जखमी पाटणा (बिहार) येथील असल्यामुळे त्यांचे इथे कोणीच नातेवाईक नव्हते. डॉ. शेख यांनीचऑ त्यांना शक्य होईल ती सर्वोतोपरी मदत करीत होते. त्याच दिवशी रात्रीला त्यातील एका जखमी महिलेचेही निधन झालं. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी आपल्या काही सहकाऱ्यांच्या माध्यमातून त्या महिलेचे सर्व क्रियाकर्म नाशिकच्या स्मशानभूमीत पार पाडला होता. बिहार मधील त्या सर्व जखमी लोकांसाठी बिहारच्या तत्कालीन मुख्यमंत्री राबडीदेवी यांचा तत्कालिन मंत्री छगन भुजबळांना फोन आला होता. मग भुजबळांना बरोबर घेऊन डॉ. शेख शताब्दी हॉस्पिटलला गेले. तिथे भुजबळांनी सर्व जखमींची विचारपूस करून आर्थिक मदत केली होती. त्यातील गंभीर जखमी दीपक आणि स्नेहा या दोन्ही बहीणभावांना वाचवण्यात शताब्दी हॉस्पिटलच्या टीमला यश आलेलं होतं. परन्तु, नुकताच एक योगायोग असा जूळून आला की, ते दोन्ही बहीण भाऊ सतरा वर्षानंतर भेटण्यासाठी डॉ. शेख यांच्या ममता हॉस्पिटलला आले होते. त्या दोघांना बघून डॉ. शेख यांना खूप आनंद झाला आणि त्यांना आनंदाश्रू पण आले. डॉ. शेख यांनी त्या दोघांचा शाल आणि पुष्पगुछ देऊन सत्कार केला आणि भावी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

### कुठे आडवी आली जात आणि धर्म?

या बातमीतील फोटोत जो जखमी मुलगा आहे, तोच मुलगा शेजारच्या फोटोत आहे. विशेष म्हणजे त्याचा जखमी अवस्थेतील फोटो सुद्धा त्यानेच डॉ. झाकीर शेख यांना दिला. सतरा वर्षांपूर्वी जखमी झालेले बिहार मधील ते दोघे बहिण भाऊ कोणत्या जाती धर्माचे होते याची जाणीव डॉ. शेख यांना नव्हती; तर ज्यांनी आपल्याला मदत केली ते डॉक्टर कोणत्या जाती धर्माचे आहे, हे त्या बहिण भावांना देखील माहित नव्हते. मानवतेच्या या घटनेमुळे दोन परप्रांतीय एकमेकांचे खरे नातेवाईक झाले हे मात्र नक्की.

# निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळ्याचे मनपातर्फे आज स्वागत

## अध्यात्म, संस्कृती अन् भक्तीचा संगम पंचायत समितीत दिसणार

**नाशिक ।** विश्वगुरु संत निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळ्याचे आज (दि. १२) नाशिक पंचायत समितीच्या प्रांगणात नाशिक महापालिकेच्यावतीने भव्य स्वागत करण्यात येणार आहे.

आषाढी एकादशी पायी वारीसाठी सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून निवृत्तिनाथ महाराज पालखी सोहळ्याचे दि. १० जून रोजी प्रस्थान झाले. पालखीचा पहिला मुक्काम पेगलवाडी येथे निवृत्तिनाथदादांचे गुरू गहिनाथ यांच्या मठात झाला. बुधवारी पालखी सोहळा नाशिक शहरात दाखल झाला. सातपूर येथे पालखीचा दुसरा मुक्काम पडला. आज गुरुवारी (दि. १२) सकाळी ७.३० वाजता हा सोहळा नाशिक पंचायत समितीच्या आवारात दाखल होणार आहे. पंढरपूरकडे प्रस्थान करणारी पायी वारकरी दिंडी आणि संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज पालखीने शहरात प्रवेश केला आहे. यानिमित्ताने शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, नाशिक महानगरपालिका आणि निवृत्तीनाथ महाराज स्वागत समिती संस्था, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने या पालखीचे पारंपरिक स्वागत पंचायत समिती



कार्यालय, त्र्यंबकरोड येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात करण्यात येणार आहे. या स्वागत कार्यक्रमास नाशिक महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री या प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त नितीन पवार, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय पाथरुट आणि मुख्य लेखा परीक्षक बळवंत गायकवाड यांसह मनपाचे सर्व अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात निवृत्तीनाथ महाराज सामाजिक सेवा संघाचे अध्यक्ष पद्माकर पाटील, सरचिटणीस सचिन डोंगरे, मुख्य समनव्ययक रत्नाकर चुंभळे, राहुल बर्वे, कैलास सोनवने व इतर समिती सदस्य उपस्थित राहतील. वारकऱ्यांचे स्वागतही नाशिकच्या आध्यात्मिक आणि सेवाभावी परंपरेचा भाग असून, या प्रसंगी वीणेकरी, मानकरी, पालखीप्रमुख यांचा विशेष सत्कार सोहळा गुरुवारी सकाळी ९ वाजता पंचायत समिती कार्यालय, त्र्यंबकरोड येथे आयोजित करण्यात आला आहे. या वारीत सहभागी होणाऱ्या सर्व पायी वारकरी भाविकांचे मनोभावे स्वागत करण्यात येणार असून त्यांच्यासाठी अल्पोपहार, चहा-पाण्याची सुविधा, वैद्यकीय तपासणी व प्राथमिक उपचार, स्वच्छतागृहे आदी सुविधा महानगरपालिका व समितीच्या संयुक्त विद्यमाने सज्ज करण्यात आल्या आहेत.

संत निवृत्तीनाथ महाराज यांची वारी म्हणजे भक्ती, समर्पण आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. ही वारी केवळ अध्यात्मिक यात्रा नसून ती समाजाला सेवाभाव, संयम, शिस्त आणि एकोपा यांचे शिकवण देणारी परंपरा आहे. नाशिककरांच्या सहकार्याने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ही वारी भाविकांच्या श्रद्धेचा उत्सव ठरणार आहे. समस्त नाशिककर नागरिकांनी या पवित्र पालखी सोहळ्यास उपस्थित राहून संत परंपरेचे दर्शन घ्यावे असे आवाहन नाशिक महानगरपालिका व निवृत्तीनाथ महाराज पालखी स्वागत समिती, नाशिक यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

# ग्लॅम वर्ल्ड



## 'हाऊसफुल ५' १०० कोटींच्या क्लबमध्ये?

२०२५ हे वर्ष बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारसाठी लाभदायी ठरले आहे. या वर्षी त्याचा तिसरा चित्रपट प्रेक्षकांकडून खूप प्रेम मिळवत असल्याचे दिसून येत आहे. साजिद नाडियाडवालाचा हिट फ्रँचायझी चित्रपट 'हाऊसफुल ५' अलिकडेच प्रदर्शित झाला. यावेळी नाडियाडवालाने चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बनवण्यात कोणतीही कसर सोडलेली नाही. चित्रपट वेगवेगळ्या क्लायमॅक्ससह प्रदर्शित झाला. रिलीज होण्यापूर्वीच त्याबद्दल बरीच चर्चा होती. यात अक्षय कुमार, अभिषेक बच्चन आणि रितेश देशमुख यांच्यासह अनेक प्रसिद्ध चेहरे आहेत. चित्रपटाला आयएमडीकडून ४.० रेटिंग मिळाले. सुरुवातीला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला. पण आता तो प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी होताना दिसत आहे. 'हाऊसफुल'च्या या पाचव्या भागात अनेक खास गोष्टी पाहायला मिळत असून मागील भागातील काही दृश्ये 'हाऊसफुल ५' मध्ये दाखवण्यात आली आहेत. यामुळे कथेत एक कनेक्शन दिसते. बॉबी देओलच्या प्रवेशाने थिएटरमध्ये लोक आश्चर्यचकित होतात. तो चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो कारण आणि त्याच्या एका घोषणेने जहाजावर उपस्थित असणाऱ्या सर्व लोकांचे नशीब उजळते. अर्थात चित्रपटाच्या कथेची आणि सस्पेन्सची माहिती तुम्हाला 'हाऊसफुल ५' पाहिल्यानंतरच मिळेल.

अक्षय कुमारच्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी भारतात २४ कोटींचा गल्ला जमवला. शनिवारी कलेक्शन वाढले आणि हा आकडा ३१ कोटींवर पोहोचला. रविवारीही त्याने चांगली कामगिरी केली. यानंतर हा चित्रपट आता १०० कोटींच्या अगदी जवळ पोहोचला आहे.



## ...मग ही तर पर्वणीच

'बाहुबली' आणि 'आरआरआर' सारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर आता चाहते एसएस राजामौलीच्या पुढच्या चित्रपटाची वाट पाहत आहेत. सध्या ते महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा यांच्यासोबत एक जंगल ॲडव्हेंचर बनवत आहे. ताजी बातमी म्हणजे यात 'रहना है तेरे दिल में' फेम अभिनेता आर माधवनचा प्रवेश निश्चित झाला आहे.

आर माधवन या १,००० कोटींच्या महाकाव्यात्मक चित्रपटात अत्यंत मजबूत भूमिका साकारू शकतो, असे म्हटले जात आहे. तथापि, निर्मात्यांनी अद्याप याची पुष्टी केलेली नाही. पृथ्वीराज सुकुमारन देखील या चित्रपटात आहे. तेव्हा माधवन यात दिसला तर राजामौली आणि माधवन एकत्र काम करण्याची ही पहिलीच वेळ असेल. स्वाभाविकच प्रेक्षक या पर्वणीची वाट पहात आहेत.

राजमौली यांच्या या बहुचर्चित चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता असली तरी त्याबद्दल सर्व काही अतिशय गुप्त ठेवले जात आहे. हा एक ॲक्शन–ॲडव्हेंचरपट असेल, एवढीच माहिती समोर येत आहे. राजामौली यांनी २०२४ मध्येच केनियामध्ये एक लोकेशन पाहून ठेवले होते. कदाचित आता या चित्रपटाचा काही भाग तेथे शूट केला जाऊ शकतो. या चित्रपटाचे संगीत एमएम कीरावानी यांच्या हाती आहे. यापूर्वी त्यांनी 'आरआरआर' मधील 'नाटू नाटू' साठी ऑस्कर जिंकला आहे.

या व्यतिरिक्त आर. माधवन 'आप जैसा कोई' या प्रोजेक्टवर देखील काम करत आहे. यामध्ये फातिमा सना शेख त्याच्यासोबत पडदा शेअर करत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. तेव्हा आर. माधवन यांच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बाब ठरु शकते.

## वाद चिघळला आणि...

दक्षिणेतील सुपरस्टार कमल हासन यांचा बहुप्रतिक्षित 'ठग लाईफ' देशभरात प्रदर्शित झाला असला तरी वादांमुळे तो कर्नाटकात प्रदर्शित होऊ शकलेला नाही. या चित्रपटाला कर्नाटकात मोठ्या प्रमाणात निषेध नोंदवला गेला. पुढे तो इतका वाढला की थिएटर मालकांना धमक्या येऊ लागल्या. परिस्थितीचे गांभीर्य पाहून कर्नाटक थिएटर असोसिएशनने सुरक्षेची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु न्यायालयाने त्यावर त्वरित सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यामुळेच ही बाब सध्या चांगलीच चर्चेत आहे. सिनेमागृहांना सुरक्षा प्रदान करण्याची मागणी मान्य झाली असती तर चित्रपटाचे सुरक्षित प्रदर्शन शक्य झाले असते. मात्र तसे न झाल्याने मोठा फटका सहन करावा लागत आहे, असे म्हणावे लागेल.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने तात्काळ दिलासा देण्यास नकार दिला आणि याचिकाकर्त्यांना प्रथम कर्नाटक उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. 'तुम्ही प्रथम राज्याच्या उच्च न्यायालयाशी संपर्क साधावा. आम्ही या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करू शकत नाही...' असे मत त्यांनी व्यक्त केले.

'ठग लाईफ' वरील हा वाद कसा सुरू झाला हे वाचक जाणतात. कमल हासन यांनी चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान कन्नड भाषेबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली, आणि तेव्हापासून हा मुद्दा चिघळला. या टिप्पणीनंतर कर्नाटकात त्यांच्या विरोधात निदर्शने सुरू झाली आणि अनेक संघटनांनी त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी केली. या प्रकरणी अभिनेत्याला माफी मागण्यास सांगण्यात आले होते, परंतु त्यांनी माफी मागितली नाही. त्यामुळे कर्नाटकात त्यावर बंदी घालण्यात आली. त्याचमुळेच कमल हासन यांचा हा चित्रपट पाच जून रोजी देशभरात प्रदर्शित झाला असला तरी कर्नाटकातील प्रेक्षकांपुढे तो येऊ शकलेला नाही.




## कसा असेल 'अखंड २'

नंदमुरी बालकृष्ण आगामी चित्रपटांमुळे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. काही हिट चित्रपटांच्या सिक्वेलची सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यांचा 'अखंड' २०२१ मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रेक्षकांना त्यांचे काम खूप आवडले होते. आता ते त्याच्या सिक्वेलने सर्वांचे मन जिंकण्यास सज्ज आहेत. 'अखंड २' प्रदर्शित होण्यासाठी सज्ज असून निर्मात्यांनी टीझर रिलीज करून सगळ्यांनाच आश्चर्यचकित केले आहे.

ज्येष्ठ तेलुगू अभिनेता नंदमुरी बालकृष्ण आणि दिग्दर्शक बोयापती श्रीनु यांनी 'अखंड २' साठी पुन्हा एकदा हातमिळवणी केली आहे. यापूर्वी दोघांनीही तीनदा प्रोजेक्टवर काम केले आहे. अशातच त्यांच्या आगामी चित्रपटाचा अद्भुत टीझर रिलीज झाला आहे.

'अखंड २' ची निर्मिती राम अचंता आणि गीपचंद अचंता यांनी केली आहे. प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये बालकृष्ण पूर्णपणे नवीन अवतारात दिसत असून त्यामध्ये आध्यात्मिक प्रतिमेसह जोरदार ॲक्शन दिसून येते. यामध्येही त्यांचे पात्र पहिल्या भागात होते तसेच दिसले आहे. टीझर पाहिल्यानंतर सोशल मीडियावरील वापरकर्त्यांनी भरघोस प्रतिक्रिया दिल्या असून अभिनेत्याच्या कामाचे कौतुकही केले आहे.

'अखंड २' चा टीझर पाहिल्यानंतर, चित्रपटप्रेमींमध्ये याबद्दलची उत्सुकता वाढली आहे. नंदमुरीच्या चाहत्यांनीही टीझरला पसंती देण्यास सुरुवात केली आहे. रिलीज तारखेबद्दल बोलायचे झाले तर प्रेक्षकांना चित्रपटासाठी जास्त वाट पाहावी लागणार नाही. हा चित्रपट २५ सप्टेंबर २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्याच्या पहिल्या भागाबद्दल बोलायचे तर 'अखंड' ने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींहून अधिक कमाई केली होती. आता त्याचा सिक्वेल कशी कामगिरी करतो हे पाहणे मनोरंजक असेल.



## हिनाचे हात मेहंदीने सजले

'ये रिश्ता क्या कहलाता है' मधील 'अक्षरा' म्हणजेच हिना खानने प्रियकर रॉकी जयस्वालशी अचानक लग्न करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले. तिने रॉकीबरोबर साधेपणाने आणि कोणत्याही डामडौलाशिवाय लग्न केले असले तरी त्यांची झलक सोशल मीडियावर प्रचंड वेगाने पसरली.

हिना खान आणि रॉकी जयस्वाल हे लोकप्रिय टीव्ही जोडपे आहे. दोघांनीही नेहमीच परस्परांमधील नाते सार्वजनिकरित्या स्वीकारले आहे. पण ते अचानक आणि इतक्या साध्या पद्धतीने लग्न करतील असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र त्यांनी अगदी साध्या पद्धतीने लग्न केले. इतकेच नाही तर या अभिनेत्रीने लग्नाचा लूकही अगदी मिनिमलिस्ट ठेवला होता.

मात्र आता तिने लग्नाचा लूक मिनिमलिस्ट का ठेवला हे सांगितले. तिने लग्नाचे नवीन फोटो शेअर केले असून त्यात ती खूप सुंदर दिसते. तिने लग्नाच्या दुपट्ट्यावर 'हिना आणि रॉकी' असे लिहिलेले दाखवले आहे. हे फोटो शेअर करताना हिनाने लेहेंगा, भारी दागिने आणि भारी मेकअपऐवजी लग्नाचा साधा लूक का निवडला हे सांगितले. तिने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, या सुंदर दिवशी मी मिनिमलिस्ट राहायला हवे होते तितके राहू शकले, याचा आनंद आहे. कोणताही हेवी लेहेंगा नाही, जास्त मेकअप नाही किंवा जड दागिने नाहीत, मोठी केशरचना नाही किंवा जास्त ॲक्सेसरीजही नाहीत. मला यापैकी काहीही करण्याची गरज नव्हती कारण मी आतून समाधानी होते. माझ्यासाठी तेवढेच महत्त्वाचे होते...!


हिना खानने लग्नात मनीष मल्होत्राने डिझाइन केलेली ओपल ग्रीन रॉ सिल्क साडी नेसली होती. त्यामध्ये ती कमालीची सुंदर दिसत होती. तिच्या लूकला कमीत कमी दागिन्यांनी स्टाईल केले गेले होते. रॉकीने मनीष मल्होत्राने डिझाइन केलेला ऑफ व्हाइट कुर्ता–पायजमा घातला होता.



बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता आपल्या वाढदिवसाच्या जंगी पार्टीमुळे, त्यातील पेहरावामुळे प्रकाशझोतात राहिल्या. यात मुलगीही मागे नाही. डिझायनर मसाबा गुप्ता नुकतीच आई झाली आहे. काही महिन्यांपूर्वी तिने पहिल्या मुलाचे स्वागत केले. पण आता दुसऱ्या गरोदरपणाच्या बातमीमुळे पुन्हा एकदा तिच्याबाबत चर्चा होत आहे. अलीकडेच तिचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून ती गरोदर असल्याच्या अटकळींना उधाण आले आहे. चाहत्यांपासून माध्यमांपर्यंत सर्वजण मसाबा गुप्ता पुन्हा आई होणार आहे का? हा एकच प्रश्न विचारत आहेत.

नुकतेच सोनम कपूरने तिच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त एका पार्टीचे आयोजन केले होते. त्यावेळी बॉलिवूड आणि फॅशन इंडस्ट्रीतील अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. करीना कपूर, जान्हवी कपूर,

## थोडी वाट बघा



शिल्पा शेट्टी आणि इतर मोठ्या स्टार्सबरोबर मसाबा गुप्ता देखील पती सत्यदीप मिश्रासोबत पार्टीला पोहोचली होती. हे जोडपे पार्टीतून बाहेर पडले आणि त्यांनी पापाराझींसमोर पोज दिली तेव्हा लोकांचे लक्ष मसाबाच्या लूककडे गेले. त्यानंतर ती पुन्हा एकदा आई होणार असल्याची बातमी पसरली.

पार्टीत मसाबाने काळ्या रंगाचा बॉडीकॉन ड्रेस घातला होता आणि त्यावर सुंदरसे जॅकेट देखील घातले होते. मात्र या पोशाखात तिचे पोट थोडे मोठे दिसत होते. ते पाहून अनेकांनी ती दुसऱ्यांदा गर्भवती असल्याचा अंदाज बांधला. व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच मसाबाच्या गरोदरपणाबद्दल बोलले जाऊ लागले. काही वापरकर्त्यांनी तिचे थेट अभिनंदन करण्यास सुरुवात केली तर काहींनी याला केवळ गैरसमज म्हटले. तथापि, आतापर्यंत मसाबा किंवा तिच्या कुटुंबाकडून या विषयावर कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. त्यामुळे चाहत्यांनी आनंदाच्या बातमीसाठी थोडी वाट पहावी हे उत्तम.

## नावात बदल?

विवेक अग्निहोत्री चित्रपटांमधून महत्त्वाचे विषय मांडण्यासाठी ओळखले जातात. 'द काश्मीर फाइल्स'च्या यशानंतर त्यांना असे अनेक चित्रपट बनवण्याची संधी मिळाली असून सध्या ते 'दिल्ली फाइल्स'वर काम करत आहेत. मध्यंतरी याची घोषणा करण्यात आली होती. पण आता चर्चा आहे की, अग्निहोत्री यांच्या आगामी चित्रपटाचे नाव पूर्वी सांगितलेल्या नावासारखे नसेल.

'द ताश्कंद फाइल्स' आणि 'द काश्मीर फाइल्स' सारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध असणारे हे चित्रपट निर्माते आता चित्रपटाचे नाव बदलण्याची योजना आखत आहेत. मग प्रश्न असा उद्भवतो की, सर्व गोष्टी निश्चित झाल्यानंतर चित्रपटाचे शीर्षक बदलण्याची गरज का पडली? हा प्रश्न अद्याप तरी अनुत्तरित आहे.

विवेक अग्निहोत्री यांना पुढील चित्रपटाचे नाव 'द बंगाल फाइल्स' असे ठेवता येईल. यामागील कारण म्हणजे चित्रपटाची संपूर्ण कथा बंगालच्या इतिहासावर आधारित असणार आहे. अशा परिस्थितीत दिल्लीचे नाव कथेशी जुळणार नाही. विवेक अग्निहोत्री यांनी नुकतेच त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो शेअर केला आणि लिहिले की, 'तुम्हापैकी अनेकांनी 'द दिल्ली फाइल्स' किंवा 'द बंगाल फाइल्स' या नावावर प्रतिक्रिया शेअर केली आहे. मात्र आता माझ्याकडे एक मोठी अपडेट आहे, पण मी आत्ता त्याबद्दल माहिती देणार नाही. त्यासाठी तुम्ही वाट पाहा.'


या चित्रपटाचा टीझर आधीच प्रदर्शित झाला आहे. त्यात बंगालमधील एक दुखद घटना दाखवण्यात आली आहे. चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता मिथुन चक्रवर्तीची झलकही त्यात पाहायला मिळते. हा अभिनेता जळलेल्या जिभेने भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचत असल्याचे टीझरमध्ये बघायला मिळाले. यावरूनच त्याला काही वेदनादायक घटनांना सामोरे जावे लागले आहे, हे स्पष्ट होते. चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबद्दल बोलताना, निर्मात्यांनी २०२५ च्या अखेरीस तो मोठ्या पडद्यावर आणण्याची योजना आखली असल्याचे स्पष्ट केले. त्यात अनुपम खेर आणि पल्लवी जोशी मुख्य भूमिकेत दिसतील. मात्र सध्या सर्वांना अग्निहोत्रींच्या नावाच्या घोषणेची उत्सुकता आहे.



## येतो आहे 'बिग बॉस १९'

चाहते टीव्हीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस'च्या नवीन सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. 'बिग बॉस' चाहत्यांना होस्ट म्हणून सलमान खान खूप आवडतो. एकंदरच सध्या 'बिग बॉस १९' बद्दल चर्चा सुरू असून तो आतापर्यंतचा सर्वात मोठा सीझन असेल असे म्हटले जात आहे. हा शो सुमारे पाच महिने चालेल. निर्मात्यांनी स्पर्धकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. अपडेट असे की, निर्मात्यांनी शोसाठी एका प्रसिद्ध युट्यूबरशी संपर्क साधला आहे.

'बिग बॉस १९' बद्दल सुरुवातीला सोशल मीडियावर म्हटले जात होते की यावेळी कोणत्याही युट्यूबर किंवा सोशल मीडिया स्टार्सशी संपर्क साधला जाणार नाही. तथापि, आता दिसते की ती फक्त अफवाच होती कारण एका प्रभावशाली व्यक्तीचे नाव सतत या शो शी जोडले जात आहे. मुख्य म्हणजे तो तुरुंगवास आणि घटस्फोटामुळे चर्चेत राहिलेला आहे.




'बिग बॉस' च्या इंस्टाग्राम पोस्टनुसार, सलमान खानच्या या शोसाठी 'फ्लाइंग बीस्ट' नावाचे चॅनल चालवणाऱ्या युट्यूबरला ऑफर देण्यात आली आहे. तो कधीकधी घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत येतो तर कधी अन्य एखाद्या कारणासाठी त्याच्या नावाची चर्चा असते. एकदा तर तो वाढदिवस साजरा करण्यासाठी तुरुंगात गेला होता. तर हा युट्यूबर दुसरा तिसरा कोणी नसून गौरव तनेजा आहे. त्यालाच 'बिग बॉस' ची ऑफर देण्यात आली आहे. तथापि, अद्याप यासंबंधीची कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.



# सेन्सेक्स 123 अंकांनी वाढला
# गुंतवणूकदारांनी 12 हजार कोटी कमावले

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

बुधवार, ११ जून रोजी भारतीय शेअर बाजारात सौम्य तेजी दिसून आली. बीएसई सेन्सेक्स १२३.४२ अंकांनी वधारून ८२,५१५.१४ वर बंद झाला, तर निफ्टीने ३७.१५ अंकांची वाढ नोंदवत २५,१४१.४० ची पातळी गाठली. आज व्यवहारादरम्यान बाजारात काहीशी चढ-उताराची स्थिती राहिली, विशेषतः उच्चांकांवर नफा बुकिंग झाल्यामुळे तेजी मर्यादित राहिली.

आजच्या व्यवहारात आयटी, तेल व वायू क्षेत्रातील शेअर्समध्ये खरेदीचा जोर दिसून आला, तर एफएमसीजी आणि सार्वजनिक बँकांमध्ये विक्रीचा दबाव होता. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.१२ टक्क्यांनी घसरला, तर स्मॉलकॅप



निर्देशांकात ०.०६ टक्क्यांची किरकोळ वाढ झाली.

बीएसईवरील सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४५५.५३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे, जे मागील दिवसाच्या तुलनेत सुमारे १२,००० कोटी रुपयांनी अधिक आहे. यामुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीतही वाढ झाली आहे.

सेन्सेक्समधील ३० पैकी १६

**सेन्सेक्स 82,515**

**निफ्टी 25,141**

शेअर्स वधारले. त्यापैकी एचसीएल टेकमध्ये सर्वाधिक ३.२२ टक्क्यांची वाढ झाली. इन्फोसिस, टेक महिंद्रा, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बजाज फिनसर्व्ह यांचे शेअर्सही ०.७० टक्क्यांपासून २.१६ टक्क्यांपर्यंत वधारले.

दुसरीकडे, १४ शेअर्स घसरले. पॉवर ग्रिडचा शेअर १.८९ टक्क्यांनी घसरला. तसेच अदानी पोर्ट्स, इंडसइंड बँक, नेस्ले इंडिया आणि एचडीएफसी बँकेचे शेअर्सही कमजोरीत बंद झाले.

आजच्या व्यवहारात ऑटो, फार्मा आणि मेटल क्षेत्रात संमिश्र कल दिसून आला. वाहन कंपन्यांच्या शेअर्समध्ये काही प्रमाणात खरेदी झाली, तर फार्मा क्षेत्रातील निवडक कंपन्यांमध्ये दबाव होता. जागतिक बाजारातील स्थैर्य आणि गुंतवणूकदारांचा निवडणूक परिणामानंतरचा विश्वास टिकून असल्यामुळे बाजाराला आधार मिळत आहे. पुढील काही दिवसांत विदेशी संस्थात्मक गुंतवणूक आणि महागाईदराचे आकडे हे बाजाराच्या दिशा ठरवतील.

# ट्रम्पविरोधी वक्तव्यांचा मस्क यांना पश्चात्ताप

**वॉशिंग्टन, दि. ११ वृत्तसंस्था**

गेल्या दोन आठवड्यांपासून अमेरिकेसह जगभरात अचानक चर्चेत आलेला मुद्दा म्हणजे डोनाल्ड ट्रम्प व एलॉन मस्क यांचं भांडण. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत एलॉन मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा असल्याचं जाहीर केलं होतं. तेव्हापासून त्या दोघांमधील मैत्री चर्चेत आली होती. निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकन सरकारमध्ये एक स्वतंत्र विभाग तयार करून एलॉन मस्क यांच्याकडे त्याचं प्रमुखपद सोपवलं. त्यामुळे ट्रम्प-मस्क दोस्तीची चर्चा संपते न संपते तोच ती तुटल्यामुळे सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. त्यावर आता एलॉन मस्क यांनी आपल्याला पश्चात्ताप होत असल्याचं म्हटलं आहे.

गेल्या दोन आठवड्यांमध्ये एकमेकांवर भरपूर टीका केल्यानंतर



आता एलॉन मस्क यांनी माघार घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्याबद्दल आपण केलेल्या काही पोस्ट या चुकीच्या होत्या, असं मस्क यांनी ट्वीटमध्ये म्हटलं आहे. "गेल्या आठवड्यात मी डोनाल्ड ट्रम्प यांच्याबाबत केलेल्या पोस्टबद्दल मला पश्चात्ताप होत आहे. ते जरा अतीच झालं", असं मस्क यांनी बुधवारी ११ जून रोजी केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

दोन आठवड्यांपूर्वी एलॉन मस्क यांनी डोनाल्ड ट्रम्प प्रशासनातून बाहेर पडत असल्याचं जाहीर केलं. तेव्हापासून या दोघांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली. आपणच मस्क यांना बाहेर पडण्यास सांगितल्याचा दावा ट्रम्प यांनी केला. त्यानंतर एलॉन मस्क यांनी ट्रम्प प्रशासनाकडून सादर करण्यात आलेल्या नव्या कर विधेयकावर टीका करणारी पोस्ट केली. हे विधेयक वाईट असल्याचं सांगताना विधेयकाला पाठिंबा देणाऱ्या ट्रम्प यांच्या पक्षातील सिनेट सदस्यांविरोधात जाहीर भूमिका घेतली.

दरम्यान, ट्रम्प यांनी काही दिवसांनी एनबीसी न्यूज या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये एलॉन मस्क यांना गंभीर परिणामांना सामोरं जावं लागेल, असा इशारा दिला होता. सत्ताधारी पक्षाच्या सिनेट सदस्यांना विरोध करणाऱ्यांना मस्क यांनी आर्थिक पाठबळ दिल्याचा दावा ट्रम्प यांनी केला होता. "जर त्यांनी हे करणं चालू ठेवलं, तर त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागतील. आता मस्क यांच्याशी जुळवून घेण्याचा कोणताही विचार नाही", असं ट्रम्प यांनी या मुलाखतीमध्ये स्पष्ट केलं होतं.

# " राजा व सोनम रघुवंशी यांच्या कुटुंबियांनी माफी मागावी "

**शिलॉन्ग, दि. ११ वृत्तसंस्था**

गेल्या महिन्यात इंदूरहून मेघालयला मधुचंद्रासाठी गेलेल्या नवविवाहित जोडप्यामधील पतीच्या (राजा रघुवंशी) हत्या प्रकरणाने देशभरात खळबळ उडाली आहे. २३ मे रोजी हे जोडपं शिलॉन्ग येथून बेपत्ता झालं आणि २ जून रोजी शिलॉन्गजवळील एका दरीत पतीचा मृतदेह सापडला होता. सुरुवातीला पोलिसांनी अपघाताचा संशय व्यक्त केला होता. मात्र पोलीस तपासांत समोर आलं आहे की ही पूर्वनियोजित हत्या होती. दरम्यान, पत्नीनेच तिचा प्रियकर व भाडोत्री मारेकऱ्यांच्या सहाय्याने ही हत्या घडवून आणल्याचं समोर आल्यानंतर मेघालय सरकारमधील मंत्री अलेक्झांडर लालू हेक यांनी या प्रकरणात उडी घेतली आहे. सात दिवसांत मेघालय पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावल्याबद्दल त्यांनी आधी पोलिसांची पाठ थोपटली. तसेच मेघालय राज्याची बदनामी केल्याप्रकरणी सोनम व राजा रघुवंशीच्या कुटुंबीयांनी माफी मागावी अशी मागणी हेक यांनी केली आहे.



मंत्री अलेक्झांडर लालू हेक म्हणाले, "ईशान भारतातील सुंदर अशा मेघालयमध्ये इंदूरमधील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक राजा रघुवंशी याच्या हत्येनंतर राष्ट्रीय स्तरावर या प्रकरणाची बरीच चर्चा चालू आहे. मात्र, चर्चेची कारणं चुकीची आहेत. या प्रकरणात मेघालय पोलिसांवर टीका झाली. मात्र, त्यांनी अवघ्या सात दिवसांत हा गुंतागुंतीच्या प्रकरणाचा तपास पूर्ण केला आहे. तत्पूर्वी राजा व सोनम बेपत्ता झाल्यानंतर अनेकांनी ईशान्य भारताची, मेघायल राज्याची बदनामी केली. राजा व सोनमच्या कुटुंबियांनी आमच्या राज्याची बदनामी केली. त्यामुळे त्यांनी आता माफी मागायला हवी. राजा व सोनमच्या कुटुंबियांनी मेघालयची माफी मागितली नाही तर आमचं राज्य सरकार दोन्ही कुटुंबांविरोधात मानहानीचा खटला दाखल करेल. दरम्यान, नवविवाहितेनेच तिचा प्रियकर व भाडोत्री मारेकऱ्यांच्या मदतीने या हत्येचा कट रचल्याचं पोलीस तपासांत उघड झालं आहे. न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, कॉल रेकॉर्ड्स व आरोपींची कबुली याच्या मदतीने पोलिसांनी आतापर्यंत पाच आरोपींना अटक केली आहे. 'ऑपरेशन हनीमून' या नावाने एक पोलीस पथक स्थापन करून पोलिसांनी हे गुंतागुंतीचं प्रकरण जवळपास सोडवलं आहे. सध्या या प्रकरणातील आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

# फ्लॅटचा ताबा देण्यास विलंब झाल्यास कर्जाचे व्याज बिल्डरने देणे बंधनकारक नाही : सुप्रीम कोर्ट

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

एखादा गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला किंवा फ्लॅटचा ताबा वेळेवर मिळाला नाही तर डेव्हलपरला (विकासक) गृह खरेदीदाराला मूळ रक्कम व्याजासह परत करावी लागेल, मात्र घर खरेदी करणाऱ्याने फ्लॅटसाठी घेतलेल्या वैयक्तिक कर्जावरील व्याजाची जबाबदारी डेव्हलपरवर टाकता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रसन्न बी. वरळे यांच्या खंडपीठाने दिला. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत भरपाई मनमानी पद्धतीने दिली जाऊ शकत नाही, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले आहे.

पंजाबमधील मोहाली शहरात २०११ मध्ये अनुपम गर्ग आणि इतरांनी ग्रेटर मोहाली एरिया डेव्हलपमेंट अथॉरिटी च्या ( जीएमएडीए) 'पूरब प्रीमियम अपार्टमेंट्स' योजनेत



फ्लॅटच्या एकूण किमतीच्या दहा टक्के रक्कमेची भरणा करुन फ्लॅट बुक केले होते. करारानुसार विकसकाने ३६ महिन्यांच्या आत फ्लॅट्स ताब्यात द्यायचे होते; परंतु मे २०१५ पर्यंत बांधकाम अपूर्ण होते. तसेच फ्लॅटचा ताबा पुढील २-३ वर्षांसाठी ताबा मिळण्याची शक्यता नसल्याचेही स्पष्ट झाले. अनुपम गर्ग व इतरांनी विकसकाकडे परतफेड मागितली. तसच राज्य ग्राहक आयोगाकडे तक्रारही केली.

या प्रकरणी राज्य ग्राहक वाद निवारण आयोगाने अनुपम गर्ग यांच्या बाजूने निकाल दिला 'जीएमएडीए'ला संपूर्ण जमा रक्कम ५०,४६,२५० रुपये वार्षिक आठ टक्के व्याजदराने परत करण्याचे आदेश दिले. तसेच फ्लॅट खरेदी करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज देण्याचे, मानसिक त्रास आणि खटल्याच्या खर्चाची भरपाई करण्याचेही निर्देश दिले होते. या निकालास 'जीएमएडीए'ने राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोग (एनसीडीआरसी) कडे आव्हान दिले. राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयागानेही राज्य ग्राहक वाद निवारण आयोगाचा निकाल कायम ठेवला होता. या निकालाविरोधात 'जीएमएडीए'ने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.

या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रसन्न बी. वरळे यांच्या खंडपीठाने आठ टक्के वार्षिक व्याज आणि मानसिक छळासाठी भरपाईसह परतफेड कायम ठेवली परंतु GMADA ला खरेदीदाराच्या गृहकर्जावर व्याज देण्याचे निर्देशाच निर्णय रद्द केला. न्यायमूर्ती करोल यांनी मागील निकालाचा हवालात देत आपल्या निकालात नमूद केले आहे की, " फ्लॅट खरेदी करणारा ग्राहक आहे आणि तो बांधणारा सेवा प्रदाता आहे. पक्षांमधील हा एकमेव संबंध आहे. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत भरपाई मनमानी पद्धतीने दिली जाऊ शकत नाही. कायदेशीर तत्त्वांवर आणि विकासकाच्या दायित्वाच्या व्याप्तीवर आधारित असावी.दिलेली व्याजाची रक्कम ही केलेल्या गुंतवणुकीसाठी पुरेशी भरपाई आहे आणि त्यापलीकडे, बिल्डरला कर्जाच्या व्याजाची रक्कम देखील भरण्यास सांगितले जाऊ शकत नाही."

# पित्याने चार मुलांसह रेल्वेखाली संपवले जीवन




**फरिदाबाद, दि. ११ वृत्तसंस्था**

हरियाणाच्या फरिदाबाद जिल्ह्यातील बल्लभगड रेल्वे स्टेशनजवळ मंगळवारी एक हृदयद्रावक घटना घडली. येथे एका व्यक्तीने त्याच्या चार मुलांना सोबत घेऊन गोल्डन टेम्पल एक्स्प्रेससमोर उडी मारून जीवन संपवले. ही घटना अनाज मंडी बल्लभगड जवळील रेल्वे उड्डाणपुलाखाली घडली. या घटनेची रेल्वेच्या लोको पायलटने रेल्वे अधिकाऱ्यांना माहिती दिली. पाचजण एकाचवेळी रेल्वेखाली चिरडल्याने रेल्वे पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलात एकच खळबळ उडाली.

या घटनेनंतर रेल्वे पोलिसांसह स्टेशन प्रभारी घटनास्थळी दाखल झाले. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे कारण प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मृत व्यक्तीचे नाव मनोज महतो (वय ३६) असे आहे. तो मुळचा बिहारचा असून तो बेलदारीचे काम करत होता. ही घटना इतकी भयानक होती की, मंगळवारी दुपारी मनोजने त्याच्या चार मुलांना रेल्वे रुळावर नेले. सर्वात लहान मुलगा तीन वर्षांचा तर मोठा नऊ वर्षांचा होता. सर्वांना रेल्वे रुळावर नेल्यावर त्याने त्यांचे हात घट्ट धरले होते. एक्स्प्रेस रेल्वे येईपर्यंत तो त्यांना घट्ट धरून राहिला आणि एका क्षणात पाचही जण होत्याचे नव्हते झाले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, गोल्डन टेम्पल एक्स्प्रेस त्यांच्या दिशेने येत असल्याचे पाहून मुलांनी वडील मनोज याला हात सोडण्याची विनवनी केली तरीही त्याने त्यांना जाऊ दिले नाही. 'दुपारी १.१० च्या सुमारास मुंबईहून आलेल्या रेल्वेखाली ते सापडले,' असे सरकारी रेल्वे पोलिस विभागाचे एसएचओ राजपाल यांनी सांगितले.

# ठाणे, मुंबई येथील नशा मुक्ती केंद्र

न्यू लाईफ केअर फाउंडेशन हे ठाणे, मुंबई येथील सर्वोत्तम नशा मुक्ती केंद्रांपैकी एक आहेजे व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन कार्यक्रम देते.हे केंद्र किफायतशीर अल्पकालीन आणि दीर्घकालीन निवासी पुनर्वसन कार्यक्रम ऑफर करतो जे व्यसनाधीन व्यक्तीने वापरलेल्या पदार्थानुसार तयार केले जातात जे आशा, आरोग्य आणि तुमचे नातेसंबंध पुनर्संचयित करण्यास मदत करतात. अल्कोहोल किंवा इतर कोणत्याही ड्रग्जचे व्यसन हे देशातील सर्वात मोठ्या आरोग्य समस्यांच्या श्रेणीत येते.आयुष्याच्या कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर मद्यपानाच्या सवयींवर अंकुश ठेवण्यासाठी अनेक लोक संघर्ष करतात. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने २०१३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार, जगभरात २४६ दशलक्ष लोक (२० पैकी १) जे १६ ते ६५ वयोगटातील आहेत, ते बेकायदेशीर औषधांच्या अतिरेकी वापरामुळे त्रस्त आहेत. या संख्येपैकी, सुमारे २७ दशलक्ष लोक ड्रग्जच्या वापराने त्रस्त आहेत जिथे १० पैकी १ मुलाला मद्यपानाच्या समस्या असलेल्या पालकांसोबत राहण्यास भाग पाडले जाते.व्यक्तीला दारूचे




किंवा कोणत्याही प्रकारच्या ड्रग्जचे व्यसन असो, ते काही काळासाठी त्यांचे आयुष्य गमावू शकते. परिस्थिती कितीही वाईट वाटली तरी, चांगली बातमी अशी आहे की थोड्याशा प्रयत्नाने ही भर प्रभावीपणे बरी होऊ

**लोकजागर**

शकते आणि आयुष्यभर व्यवस्थापित केली जाऊ शकते. त्यासाठी फक्त चांगल्या उपचारांची आवश्यकता

**लोक सेवार्थ**

आहे!हे लक्षात घेऊन, आम्ही न्यू लाईफ केअर फाउंडेशन, मुंबईतील एक आघाडीचे शीर्ष नाशा मुक्ती केंद्र, मानसिक आरोग्य संस्थेने (महाराष्ट्र, भारत) परवाना दिलेले ड्रग्ज व्यसनी आणि अल्कोहोल व्यसनासाठी मानसोपचार नर्सिंग होम, पुनर्वसन आणि डिटॉक्सिफिकेशन सेंटर येथे रुग्णांवर त्यांच्या व्यसनमुक्ती उपचार, समुपदेशन आणि पुनर्वसन कार्यक्रमांद्वारे उपचार करण्यासाठी एक समग्र दृष्टिकोन अवलंबतो. हि संस्था व्यक्ती आणि कुटुंबांना व्यसनमुक्ती मिळविण्यात मदत करण्यासाठी वचनबद्ध आहे म्हणजेच संपूर्ण नशा मुक्ती.करिता संस्था सातत्याने कार्यरत आहे. या नाशमुक्ती केंद्रामध्ये व्यसनी व्यक्तीवर उपचार केले जातात आणि त्यांच्या अस्तित्वाची कदर देखील केली जाते. या केंद्रात आलेल्या प्रत्येक नशाधीन व्यक्तीवर वैयक्तिक लक्ष आणि वैयक्तिकृत उपचार कार्यक्रम हाती घेतले जातात. नवीन रुग्णांसाठी मोफत समुपदेशन आणि सल्लामसलत देखील केली जाते. हि संस्था नाशाधीन व्यक्तींच्या केवळ पुनर्वसनाची काळजी घेत नाही तर त्यांच्या पुनर्एकीकरणावर देखील काम करते.व्यसनमुक्ती उपचारांसाठी अत्यंत व्यावसायिक दृष्टिकोन देखील संस्था ठेवते. या नशामुक्ती केंद्रात टीममध्ये प्रेम आणि काळजीच्या तत्त्वांवर काम करणारे उच्च प्रशिक्षित व्यावसायिक आहेत.एकूणच व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी हे नशामुक्ती केंद्र म्हणजे समाजासाठी एका आधार स्तंभच आहे.

# शिक्षण सेवक डॉ. दशरथ

१९८० साली अक्कलकोट येथे दशरथ भोसले शिकायला होते. त्यांचे मूळ गाव महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील मुन्नर. त्यांची आई सुभद्रा दिवसभर कष्ट करायची. काम आटपून उशिरा झोपल्यानंतर एक-दोन तास झोपली की, पुन्हा रात्री दोन-अडीच वाजता ती उठायची. दशरथ यांच्यासाठी भाकरी बनवायची. दररोज मुन्नरहून अक्कलकोटसाठी पहाटे ४ वाजता एकच एसटी यायची. सुभद्राबाई त्या एसटीमध्ये भाकरी ड्रायव्हरच्या सिटखाली ठेवायच्या, तर ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या लेकराला उपवास घडू नये, म्हणून तिची धडपड. एकेदिवशी अशीच भाकरी पाठवली. त्या भाकरीसोबत मीठ टाकून उकडलेले एक वांगे होते. ते पाहून दशरथ यांना रडू कोसळले. आईने घरातले शेवटचे उरलेले एक वांगे दशरथ यांना भाकरीसोबत पाठवले होते. याचा अर्थ आईला आज कोरडी भाकरी खावी लागेल. त्याचवेळी दशरथ यांनी ठरवले की, ही परिस्थिती पालटण्यासाठी आपण शिकायचे. आज तेच दशरथ पुण्याच्या शैक्षणिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतात. पुण्यात त्यांच्या एक-दोन नव्हे, तर आठ प्रख्यात शाळा आहेत आणि तीन महाविद्यालये आहेत. 'सुभद्रास नर्सरी भोसले पब्लिक इंटरनॅशनल स्कूल, पुणे' अर्थात 'एसएनबीपी' हे पुण्याच्या शैक्षणिक वर्तुळातले आघाडीचे नाव. या शिक्षणसंस्थेत तब्बल १ हजार, ५०० शैक्षणिक कर्मचारी कार्यरत आहेत. जवळजवळ तीन लाख विद्यार्थी त्यांच्या शिक्षणसंस्थेतून शिकून बाहेर पडले, तर सध्या २५ हजार विद्यार्थी त्यांच्या शिक्षणसंस्थेत



विद्यार्जन करीत आहेत. त्यांच्या संस्थेचे एक आंतरराष्ट्रीय स्तराचे हॉकीचे मैदानही आहे. ते गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सहकार्य करतात. गरीब कुटुंबांनी सक्षम व्हावे, यासाठी ते मदत करतात. कोरडी भाकरी भिजलेल्या आसवांसोबत खाणारे दशरथ आज एमएससी, एमफिल आणि पीएचडी मिळवून 'डॉ. दशरथ भोसले' म्हणून पुण्यामध्ये नावलौकिक मिळवून आहेत.

**शून्यातून विश्व**

त्यांनी खासगी शिकवणी सुरू केली. दशरथ यांनी नर्सरी काढण्याचा विचार केला. नेमका तेव्हाच महाराष्ट्र सरकारने स्वयंसेवी संस्थांना शिक्षणासाठी अटीशर्तीसह भूखंड देण्याची जाहिरात काढली. दशरथ यांनी त्यासाठी अर्ज केला. तीन वर्षे पुणे ते मुंबई फाईलचा ते पाठपुरावा करीत राहिले. पण, काम काही होत नव्हते. मंत्रालयात नेहमीच दिसणाऱ्या एका माणसाने दशरथ यांना सांगितले की, अमूक एक मंत्री आहेत, त्यांना ७५ हजार रुपये दिलेस, तर तुझ्या शाळेसाठी जागा तत्काळ मिळेल. उद्या पहाटे ४.३० वाजता भेटतील. पैसे घेऊन ये. पैसे दिल्याशिवाय काम होत नाही.दशरथ पुण्याला परतले. त्याच संध्याकाळी कर्ज काढले.आणि कसेबसे मुंबईला पोहोचले. तो माणूस तिथे भेटला. साहेबांना पैसे देऊन येतो, तू इथे मंत्रालयाच्या गेटजवळ थांब म्हणाला. दशरथ तिथे पहाटेपासून ते संध्याकाळपर्यंत उभे राहिले. तो काही आलाच नाही. सगळीकडे चौकशी केल्यावर कळले की, तो भामटा होता. अनेकांना त्याने लुटले होते. कर्ज आणि फसवणूक यांमुळे त्यांना कधी नव्हे, ते असाहाय्य वाटले. परंतु समाजातील सज्जनशक्तीने त्यांना साथ दिली. शेवटी शाळेसाठीची ती जागा त्यांना मिळाली. आज त्या एका शाळेपासून ११ शैक्षणिक वास्तू निर्माण झाल्या. आईची माया, प्रेम, प्रेरणा याची जाण असलेल्या दशरथ यांनी आईच्या नावे एक मंदिर बांधले. ते म्हणतात की, "मी यापुढेही सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या वाटा सोप्या व्हाव्यात, यासाठी काम करीत राहणार," असे दशरथ यांचे म्हणणे आहे. डॉ. दशरथ यांचे आयुष्य म्हणजे शून्यातून विश्व निर्माण करू इच्छिणाऱ्यांसाठी खरोखरीच एक प्रेरणेचा स्रोत आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# पंतप्रधान मोदींना भेटणाऱ्या मंत्र्यांसाठी RT-PCR चाचणी अनिवार्य

**नवी दिल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

देशभरात वाढत्या कोविड-१९ रुग्णांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटणाऱ्या मंत्र्यांना आता आरटी-पीसीआर चाचणी करावी लागणार आहे. बुधवारी भारतातील सक्रिय कोविड रुग्णांची संख्या ७ हजार पेक्षा जास्त असल्याची माहिती समोर आली आहे.



केरळमध्ये एका दिवसात सर्वाधिक १७० नवीन कोविड रुग्ण आढळले आहेत. ज्यामुळे तेथील सक्रिय रूग्णांची संख्या २,२२३ वर पोहोचली आहे. गुजरातमध्ये ११४ नवीन रुग्णांसह १,२२३ सक्रिय रुग्ण आढळले आहेत. कर्नाटकमध्ये १०० नवीन रुग्ण आढळल्याने एकूण ४५९ सक्रिय रुग्ण आहेत. गेल्या २४ तासांत दिल्लीत ६६ रुग्ण आढळल्याने शहरातील एकूण रुग्णसंख्या ७५७ वर पोहोचली आहे, असे आरोग्य मंत्रालयाने सांगितले आहे. देशात सक्रिय कोविड-१९ रुग्णांची संख्या वाढत असून आज ७ हजार च्या पुढे रूग्णसंख्या गेल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटणाऱ्या मंत्र्यांसाठी आरटी-पीसीआर चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे, असे सूत्रांनी इंडिया टुडेला सांगितले.

# बलूचिस्तानात बंडखोरांसोबत झालेल्या झटापटीत पाक सैन्याचे 23 जवान ठार

**इस्लामाबाद, दि. ११ वृत्तसंस्था**

पाकिस्तानच्या बलूचिस्तान प्रांतात पाकिस्तानी सैन्य आणि बलूच बंडखोरांमध्ये मोठी झटापट झाली आहे. वेगवेगळ्या झटापटीत पाकिस्तानी सैन्याचे २३ जवान मारले गेले तर या संघर्षात बलूच लिबरेशन आर्मीचे ९ जवानही ठार झाल्याचे पुढे आले आहे. बलूच लिबरेशन आर्मीचे प्रवक्ते जायंद बलूच यांनी एक निवेदन जारी केले आहे. त्यात गोनी पारानजीक झालेल्या संघर्षात पाकिस्तानी सैन्याला त्यांच्या मदतीसाठी हेलिकॉप्टरद्वारे कमांडो उतरवायला लागल्याचे सांगण्यात आले.

६ जूनच्या रात्री पाकिस्तानी सैन्य मस्तंग परिसरात पुढे सरकत होते तेव्हा बलूच लिबरेशन आर्मीसोबत त्यांची झटापट झाली. सकाळपर्यंत सुरू असलेल्या या संघर्षात पाकिस्तानी सैन्याचे ८ जवान मारले गेले तर अनेकजण जखमी झाले. त्याशिवाय ८ जूनला आणखी एक चकमक झाली त्यातही पाकिस्तानी सैन्याचे जवान मारले गेले. बलूचिस्तानात अनेक भागात हा संघर्ष सुरू असल्याचं बलूच लिबरेशन आर्मीचे प्रवक्ते म्हणाले.

बलूचिस्तानात बंडखोर सशस्त्र समुहाविरोधात पाकिस्तानी सैन्याचे अभियान सुरू आहे. पाकिस्तानी सैन्याने मोठ्या संख्येने



जवानांना बलूचिस्तानात उतरवले आहे तरीही बलूचिस्तानातील बंडखोर भारी पडत आहेत. मागील काही दिवसांपासून बलूचिस्तानच्या अनेक शहरांवर कब्जा करण्याच्या बातम्या पुढे आल्या होत्या. बलूच बंडखोरांना मिळणाऱ्या यशाने पाकिस्तानी सैन्य खवळलं आहे. त्यातूनच तिथल्या नागरिकांविरोधात सैन्याने क्रूर अभियान सुरू केले. बलूचिस्तानात पुन्हा एकदा लोक अचानक गायब होण्याचे प्रमाण वाढले आहे.

बलूच नागरिक गटाने सांगितले की, बलूचिस्तानात २ वेगवेगळ्या ठिकाणांहून ९ लोकांना बळजबरीने गायब करण्यात आले आहे. पासनीजवळ सुरक्षा जवानांनी २ जणांना ताब्यात घेतले आणि अज्ञात स्थळी नेले असं बलूचिस्तान पोस्टमध्ये रिपोर्ट आला आहे. तसेच सोमवारी सकाळी पाकिस्तानी सैन्याने केचमध्ये बालनिगोर जिल्ह्यात छापेमारी आणि शोध अभियान सुरू केले आहे. त्यात ७ युवकांना ताब्यात घेऊन अज्ञात स्थळी नेले.

# मुलाचा मृत्यू झाल्यावर वडिलांनी मृतदेहासोबत पुरली बाईक

**नडियाद, दि.११ वृत्तसंस्था**

गुजरातमधील नडियाद येथील उत्तरसांडा गावात एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. १८ वर्षीय क्रिश परमारचा अपघातात मृत्यू झाला. त्यानंतर कुटुंबाने असं काही केलं जे पाहून सर्वजण भावुक झाले. मुलाच्या मृत्यूनंतर कुटुंबाने एक अनोखा आणि भावनिक निर्णय घेतला. क्रिशला त्याच्या सर्वात प्रिय वस्तूसह म्हणजेच त्याच्या बाईकसह पुरण्यात आलं. हे दृश्य पाहून तिथे उपस्थित असलेल्या सर्वांच्या डोळ्यांत पाणी आलं.

२६ मे रोजी संजयभाई सुलेमानभाई परमार यांचा एकुलता एक मुलगा क्रिश परमार बीसीएसाठी रजिस्ट्रेशन करण्यासाठी एका कॉलेजमध्ये गेला होता. रात्री ८ वाजता परत येत असताना त्याची बाईक ट्रॅक्टर-ट्रॉलीला धडकली. टक्कर इतकी जोरदार होती की, क्रिशच्या डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाली. त्याला



ताबडतोब लांबवेल रोडवरील मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं, जिथे १२ दिवस जीवन आणि मृत्यूशी झुंज दिल्यानंतर शनिवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला. याने कुटुंबाला धक्का बसला.

क्रिशला त्याची बाईक खूप आवडायची. त्याचे वडील संजयभाई म्हणाले की, "क्रिशला बाईकची खूप आवड होती. आमच्याकडे कार होती, पण तो नेहमीच बाईकने प्रवास करायचा." कुटुंबाने ठरवलं की क्रिशच्या आवडत्या गोष्टी, त्याचे कपडे, बूट, चष्मा आणि बाईक त्याच्यासोबत पुरायला पाहिजेत, जेणेकरून त्याच्या आत्म्याला शांती मिळेल.

अंत्यसंस्कारादरम्यान, क्रिशची बाईक पुरण्यात आली जे पाहून गावकरी आणि नातेवाईकही भावूक झाले. क्रिशने नुकतीच १२वीची परीक्षा दिली होती आणि तो पुढील शिक्षणाची तयारी करत होता. त्याच्या मृत्यूने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. गावात शोकाचं वातावरण आहे.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
**Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219**

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**